# वचनोद्यान

डॉ. सिद्धय्या पुराणिक
अनुवादक
प्रा. चंद्रशेखर कपाळे

# वचनोद्यान

‘विद्याविनय प्रकाशन’
क्रमांक १
जानेवारी १९८३

प्रकाशक :
**श्री. विद्याचंद्र कोठारी**
‘विद्याविनय’ प्रतिष्ठान,
ब्रह्मपूर रोड,
गुलबर्गा–५८५ १०२.

© अनुवादक

मूल्य : **दहा रुपये**

वितरण व्यवस्था :
**मराठी साहित्य मंडळ,**
स्टेशन बाजार,
गुलबर्गा–५८५ १०२.

मुद्रक :
**जयंती पेपर्स**
३७४, उत्तर
सोलापूर–४१३

शब्दांना 'वचन'त्व देणाऱ्या

शरणांच्या

चरणी

हा

अनुवाद

आदरपूर्वक अर्पण

❀ ❀ ❀ - अनुवादक

# शुभकामनेगळु

'वचनोद्यान' वु कन्नड नाडिन ओळगू होरगू पडेदू, पडेयात्तलू इरुव मन्नणेयन्नु नोडि विस्मितनागिद्देने. कर्नाटक राज्य साहित्य अकाडेमियु अदक्के 1977 र सर्वश्रेष्ठ पुस्तकदेंदु पुरस्कार वन्नित्ताग ई विस्मय अंकुरिसितु; कलकत्तेय भारतीय भाषा परिषत्तिन द्राविड भाषा – विषयक प्रप्रथम पुरस्कार अदक्के दोरेताग ई विस्मय पल्लविसितु ; इदे कृतिगे कर्नाटक विश्वविद्यालयद प्रो. माळवाड बहुमान बंदाग अदु चेल्लवरियितु ; अदर हिंदि, फ्रेंच, मराठी अनुवादगळु सिद्धवागि प्रकटवागुत्तिरुवुदन्नु कंडाग अदु कुसुमिसुत्तिरुव हागे तोरुत्तिदे ननगे.

ई मराठी अनुवादवन्नु अप्रार्थितवागि स्वयंप्रेरणेयिंद कैगोंडु अत्यंत परिश्रमपूर्वकवागि पूरैसिरुववरु नन्न हळेय गेळेयरु, कलबुर्गिय सरकारी कालेजिन प्राचार्यरू, सुप्रसिद्ध मराठी प्राध्यापकरू, लेखकू हागू संशोधकरू आद श्री. चंद्रशेखर कपाळे अवरु कर्नाटकवन्नु तम्म कर्मभूमियन्नागि आरिसिकोंडिरुव ई महाराष्ट्रद सत्पुत्ररु ई अनुवाद कार्यद मूलक ई उभय राज्यगळ सांस्कृतिक संबंधगळु इन्नष्टु घनीभविसुवंते माडिद्दारे. इदक्कागि अवरिगे नन्न हृत्पूर्वकवाद अभिनंदनेगळु. वचनगळ आय्केयल्लि अवरु तम्म औचित्य-प्रज्ञेयन्नु मेरेदिद्दारे, अनुवाद कार्यदल्लि तम्म क्षमतेयन्नु तोरिद्दारे. अवर ई प्रेमद परिश्रमक्के तक्क स्वागत महाराष्ट्रदल्लि दोरियुवुदेंदु नेरे नंबिद्देने.

# शुभकामना

'वचनोद्याना'स कर्नाटकात व बाहेरही मिळालेली व मिळत असलेली मान्यता पाहून मी विस्मयचकित झालो आहे. कर्नाटक राज्य साहित्य अकाडमीच्या १९७७ चे सर्वोत्तम पुस्तक म्हणून लाभलेल्या पुरस्काराने हा विस्मय अंकुरला; कलकत्त्याच्या भारतीय भाषा – परिषदेचा द्रविड भाषा विषयक सर्वप्रथम पुरस्कार त्याला मिळाल्यानंतर हा विस्मय पालवला ; ह्या कृतीलाच कर्नाटक विश्वविद्यालयाचा प्रो. माळवाड बहुमान प्राप्त झाल्यावर हा विस्मय बहरला, तिचे हिंदी, फ्रेंच, मराठी अनुवाद सिद्ध होऊन प्रकाशित होत असलेलें पाहून तो प्रसन्नतेने फुलल्यासारखा दिसत आहे मला.

हे मराठी अनुवादाचे काम अनाहूतपणे, स्वयंप्रेरणेने हाती घेऊन अत्यंत परिश्रमाने पूर्ण करणारे माझे जुने स्नेही,गुलबर्गा येथील शासकीय महाविद्यालयाचे प्राचार्य, मराठीचे प्रसिद्ध प्राध्यापक, लेखक आणि संशोधक असलेले श्री. चंद्रशेखर कपाळे हे होत. कर्नाटक ही आपली कर्मभूमी म्हणून निवडलेल्या महाराष्ट्राच्या ह्या सुपुत्राने या अनुवादकार्याच्या निमित्ताने उभय राज्यांतील सांस्कृतिक संबंध अधिक घनिष्ठ केले आहेत. यास्तव मी त्यांचे हृत्पूर्वक अभिनंदन करतो. वचनांच्या निवडीत त्यांनी आपली औचित्य प्रज्ञा प्रकट केली आहे. अनुवादकार्यात आपली क्षमताही दर्शविली आहे. त्यांच्या या प्रेमाच्या परिश्रमाचे योग्य ते स्वागत महाराष्ट्रात होईल असा मला दृढ विश्वास आहे.

वचन साहित्य प्रकार कन्नडक्के विशिष्टवादुदु. इदर मूलवन्नु संस्कृत दंडकगळल्लि, तमिळु तेवारगळल्लि, कन्नड जानपद साहित्यदल्लि अरसुव प्रयत्नगळु फलकारियागिल्ल. इदक्के समीपद रूपगळेंदु संत आगस्तीनन वच्निगेगळन्नो, मार्कस अरेलियसन चिंतनेगळन्नो, हिब्रु प्रवादिगळ हेळिकेगळन्नो उदाहरिसुवरागलि वचनगळ विशेषते, अतिशयते, अनन्यतेगळु अवुगळवे एंबुदक्के इदिरु मातु इरलारदु. पद्यद लयवन्नू, गद्यद गाडियन्नू ओळगोंडु गद्यपद्यगळ नडुवण अंतरवन्ने इल्लवागिसि बिडुव वचनगळ रचनाविन्यास निजवागियू चेतोहारियादुदु. अदर अभिव्यक्तिय साध्यतेगळु असीमवादवुगळु. चिंतनद यावुदे सेळकुझळकुगळन्नु, अन्निसिकेय यावुदे नय-नाजूकगळन्नु लीलाजालवागि अभिव्यक्तिसबल्ल सामर्थ्य ई साहित्य प्रकारक्किदे. ‘ किरिदरोळु पिरिदुमर्थ ’ वेंब सूत्र वचनगळल्लि तन्न चरम सिद्धियन्नु पडेदुकोंडिदे. अंतेये ख्यात विद्वांसराद प्रो. बि. एच. श्रीधररू वचनगळु “ अल्पदल्लि कल्पवन्नु केत्तुव शिल्प ” एंदु मनोज्ञवागि हेळिरुवरु.

इंथ वैशिष्टच्यपूर्णवाद वचनसाहित्य भारतद महापुरुषरल्लोब्बराद बसवेश्वरर नायकत्वदल्लि ‘ नेरे बंद तोरेयंते ’ हरिदु ओदिदवर हृदय क्षेत्रगळन्नु सस्यश्यामल गोळिसितु. साहित्यिक-सामाजिक-धार्मिक महाक्रांतियोंदक्के नांदियायितु. आ कालद वचनकारर संख्ये मुन्नुरक्के मिक्किदेयेंदु हेळुत्तारे. अदरल्लि इप्पत्तु मूवत्तु वचन कार्तियरु इरवुदू, विविध श्रेणिगळु, विविध कसबुगळ श्री सामान्यरे अधिकवागिरुवुदू आश्चर्यगळल्लि आश्चर्यवेंदे हेळबेकु. शतशतमान गळिद विद्येयिंद, आत्मविकासद अवकाशगळिंद, सामाजिक न्यायदिंद वंचितरागि अनामधेयरागिद्द जनसामान्यरल्लि, अस्पृश्यरेन्निसिकोंडवरल्लि, हेंगळेयरल्लि अरिविन दोरेगळू अनुभाविगळू, वचनकाररू उदिसिदुदु आश्चर्य वल्लदे इन्नेन ?

वचन साहित्य हा प्रकार कन्नड भाषेचे खास वैशिष्टच. याचे मूळ संस्कृत 'दंडका'त, तमिळ 'तेवारा'त कन्नड जानपद साहित्यात शोधण्याचे प्रयत्न फलद्रूप झाले नाहीत. याच्याशी साम्य असणारे संत आगस्तीनचे विचार, मार्कस अरेलियसनची चिंतने, हिब्रू प्रेषितांची भाषिते ही उदाहरणादाखल दिली तर वचनांची विशेषता, श्रेष्ठता, अनन्यता त्यांच्या सारखीच आहे, असे म्हणायला विरोध असण्याचे कारण नाही. पद्याची लयकारिता, गद्याची सरणी घेऊन, गद्यपद्यामधील अंतर नाहीसे करून टाकणारा वचनांचा रचना विन्यास खरोखरच मनोहर झालेला दिसतो. त्याच्या अभिव्यक्तीची उद्दिष्टे, तऱ्हा असीम असलेल्या. चिंतनाची कोणतीही चमक, अनुभवाचा कोणताही ताणाबाणा, अनुभूतीची कोणतीही तरल सुकोमलता सहजलीलया अभिव्यक्त करण्याचे सामर्थ्य ह्या साहित्य प्रकारात आहे. 'लहानात महान अर्थ', हे सूत्र वचनांच्या ठिकाणी आपल्या चरमसिद्धीप्रत पोचलेले आहे. तसेच प्रख्यात विद्वान प्रो. बी. एच. श्रीधर यांनी वचनाचे 'अल्पात कल्प कोरलेले शिल्प' असे अगदी यथार्थ वर्णन केले आहे.

असे वैशिष्टचपूर्ण वचन साहित्य भारताच्या महापुरुषांपैकी एक अशा बसवेश्वरांच्या नेतृत्वाखाली, पूर आलेल्या नदीप्रमाणे वाहात येऊन वाचकांच्या हृदयभूमीला त्याने सस्यश्यामल करून सोडले. एका साहित्यिक - सामाजिक, धार्मिक महाक्रांतीची नांदी होऊन राहिले. त्या काळच्या वचनकारांची संख्या तीनशेहून अधिक भरते असे सांगतात. त्यांपैकी वीसतीस वचनकर्त्या स्त्रिया असणे, विविध स्तरांतील, विविध व्यवसायांतील सर्वसामान्यजन अधिक प्रमाणात असणे, हे एक महदाश्चर्यच म्हटले पाहिजे. शतकानुशतके विद्येपासून, आत्मविकासाच्या संधीपासून, सामाजिक न्यायापासून वंचित असलेल्या, अनामिक, अज्ञात जनसामान्यांतून, अस्पृश्य म्हणविल्या जाणाऱ्यांतून, स्त्रियांमधून ज्ञानियांचे राजे, महानुभाव, वचनकार उदयाला येणे हे आश्चर्य नव्हे तर काय ?

इंथ अपूर्ववाद साहित्य प्रकारवु हन्नेरडनेय शतमानद तरुवाय आगोम्मे ईगोम्मे कण्णिगे बोळुव गुप्तवाहिनियागि हरियितु. एळु शतमानगळ अवधियल्लि एळेंटु एद्दु काणुव वचनकाररन्नु मात्र इत्तु इंगि होयितेनो एंब संदेह हुट्टिसिद्दितु. आदरे प्रातःस्मरणीयराद डा. फ. गु. हळकट्टियवरु वचन साहित्यद बहुभागवन्नु प्रकटिसिद तरुवाय ई सामान्यजनर असामान्य साहित्यवु आंग्लविद्याविभूषितरन्नू बेरगुगोळिसितु. आबालवृद्धरू अदर नित्य नूतनेगे, विचार वैभवक्के, अपूर्व सौंदर्यक्के, वैविध्य विलासक्के मारुहोदरू. प्रो. एस्. वि. रंगण्ण, डॉ. ज. च. नि., प्रो. परमेश्वर भट्ट, मोदलादवरु ई हळेय रूपदल्लि होसकालद आदर्शगळन्नू, आशोत्तरगळन्नू, एरक होय्यलु मुंदादरु. ' वचनोद्यान ' वू अंथदोंदु प्रयत्न. इदक्के सिक्क प्रोत्साह पुरस्कागळु ई साहित्य प्रकारद होससाध्यतेगळल्लि नन्नंथवरिगिरुव विश्वासवन्नु पुष्टीकरिसिवेयेंदु हेळबहुदु. बेरे भाषेगळ साहित्यगळिगू इदु होस बागिलुगळन्नु तेरेदु तोरीतु–अवरुइष्टपट्टरे !

१५-११-८२

– सिद्धय्य पुराणिक

असा हा अपूर्व साहित्यप्रकार बाराव्या शतकानंतर अधूनमधून दृष्टिपथात येणाऱ्या गुप्तवाहिनीप्रमाणे वाहात राहिला. सातशे वर्षांच्या कालावधीत अवघे सात आठ नजरेत भरणारे वचनकार देऊन तो सुकून गेली की काय असा संदेह निर्माण झाला होता. परंतु प्राप्तःस्मरणीय डॉ. फ. गु. हलकट्टी यांनी वचन साहित्याचा बराचसा भाग प्रकाशित केल्यानंतर यासामान्यजनांच्या असामान्य साहित्याने आंग्लविद्याविभूषित विद्वानांनाही आश्चर्यचकित केले. त्याची नित्यनूतनता, विचार वैभव, अपूर्वसौंदर्य, विविध विलास यांनी आबालवृद्ध मोहित झाले. प्रो. एस. व्ही. रंगण्ण, डॉ. ज च. नि प्रो. परमेश्वरभट्ट हे बिनीचे साहित्यिक या जुन्या रूपात नव्या काळच्या आदर्श-आकांक्षांची मूस ओतण्यासाठी पुढे सरसावले. 'वचनोद्यान' ही असाच एक प्रयत्न. याला लाभलेल्या प्रोत्साहन पुरस्कारामुळे या साहित्यप्रकाराच्या नव्या साध्यता -सामर्थ्या-विषयी माझ्या सारख्याचा विश्वास वाढीस लागला आहे असे म्हणता येईल इतर भाषांतील साहित्यास हा नवी दालने उघडून दाखवील-अर्थात त्यांना आवडल्यास !

१५-११-८२ — सिद्धय्य पुराणिक

# अनुवादकाचे मनोगत

डॉ. सिद्धय्या पुराणिक ऊर्फ 'काव्यानंद' यांच्या 'वचनोद्यान' या कन्नड वचनसंग्रहाला कलकत्त्याच्या भारतीय भाषा परिषदेचा पुरस्कार (१९८०) प्राप्त झाल्याच्या निमित्ताने गुलबर्गा येथे त्यांचा मोठ्या प्रमाणावर सत्कार होऊन त्यांना मानपत्र अर्पण करण्यात आले. श्री. पुराणिक हे कन्नड भाषेचे एक श्रेष्ठ कवी, कादंबरीकार, नाटककार आणि चरित्रकार अशा विविध रूपांत लौकिकप्राप्त साहित्यिक असल्याने त्यांचा गौरव कर्नाटकाच्या भिन्नभिन्न भागांत झाला. ते स्वाभाविकच होते. हैदराबाद–कर्नाटक–विभाग (गुलबर्गा, रायचूर आणि बिदर) भूतपूर्व हैदराबाद संस्थानच्या काळापासून त्यांची जन्मभूमी व कर्मभूमी राहिला असल्यामुळे त्यांना लाभलेल्या गौरवाचा या भागातील साहित्यरसिकांना अधिक अभिमान वाटणे रास्त आहे. मालगुजारी खात्यात शासकीय सेवेस प्रारंभ करून शेवटी लेबर कमिशनर ( I. A. S. ) म्हणून निवृत्त झालेल्या या साहित्यिकाला वाचन-लेखनांत अहोरात्र मग्न असलेला पाहून त्यांच्या वृत्ती व व्यवसायातील अंतर्विरोधाने वाचकांना चकितच केले आहे.

मराठी वाचकांना त्यांचा व त्यांच्या 'वचनोद्याना'चा अल्पपरिचय करून देण्याच्या हेतूने 'अनुबंध' (अंक १-१७ वर्ष पाचवे, एप्रिल ते जून '८१) या त्रैमासिकातून एक लेख मी लिहिला. त्यावेळी माझे मित्र प्रा. यमनप्पा हुजरती यांच्या सहाय्याने मी त्यातील काही वचनांचा मराठीतून अनुवाद नमुन्यादाखल केला

होता. ( हा लेख पुण्याच्या 'साधने' तून ही प्रकाशित झाला आहे. ) त्यातील अनुवादित वचने उत्तम असल्याचा अभिप्राय अनेकांनी कळविला. काही मित्रांनी समग्र 'वचनोद्यान' अनुवादित करण्याचे आवाहन केले. 'वचनोद्याना'तील एकूण वचने ५२५ आहेत व आणखी तितकीच दुसऱ्या संग्रहाच्या रूपाने प्रकाशित होण्याच्या मार्गावर आहेत. इतकी सर्व वचने अल्पावधीत अनुवादित करणे कठीणच. म्हणून तुर्त १०८ वचनांचा अनुवाद करावा असे ठरवून कामास लागलो.

प्राचीन वचन साहित्याचे सर्वज्ञात लोकप्रिय स्वरूप बाराव्या शतकात सिद्ध झाले. कन्नड भाषेचे ते एक भूषण बाराव्या शतकातील शिवशरणांनी लोकशिक्षण, धर्मप्रसार, आत्मोन्नती इ. उद्दिष्टे दृष्टीसमोर ठेवून वचनांची रचना केली असली तरी यांचे साहित्यिक मूल्य ही मोठे आहे. म्हणूनच ते वाङ्मय कन्नड साहित्याचा मानबिंदू ठरले आहे. पद्याची लयबद्धता आणि गद्याची सरलता या दोन्ही गोष्टींचा त्यात सुरेख समन्वय साधला असल्यामुळे आणि त्यातील अनुभवांची प्रामाणिकता, सरळ-निर्भिड-अंतःकरणाला भिडणारी अभिव्यक्ती, विचारांची नूतनता आणि चिरकालीन जीवनमूल्यांची उपासना या वैशिष्टयांमुळे हा प्रकार अतिशय लोकप्रिय होऊन तो जनमानसात कायमचा रुजला. या आविष्कार पद्धतीचा वापर त्याच्या याच गुणांमुळे आजच्या काळातील नव्या साहित्यिकांनीही केला असावा. मराठीत जसा अभंग छंदाचा वापर माधव जूलियन आणि मर्ढेकरादी नवकवींनी केलेला आढळतो, तसाच हा कन्नड मधील प्रयोग म्हणायचा. मात्र कन्नड मधील नव्या वचन-साहित्याने खूपच उंची गाठली आहे, असे त्याला लाभलेल्या यशावरून निदर्शनास येईल. त्याची आविष्कार पद्धती (Form) जुनी असली तरी त्यात आलेल्या विषयाला नव्या जुन्याचे बंधन नाही

'वचनोद्यान' मधील वचनांतून अनुभूतीची, विचारांची, चिंतनाची अनेकविध रूपे आपल्यापुढे साकारतात. त्यातील विश्व फार व्यापक आहे. ब्रह्म चिंतनापासून दैनंदिन जीवनातील ज्वलंत समस्यां-पर्यंत त्याचे क्षेत्र विस्तारलेलें आहे. अशा स्थितीत त्यातील फक्त १०८ वचनेच निवडून काढणे म्हणजे मोठे कठीण कर्म होते. माणिक मोत्यांच्या, जडजवाहिरांच्या रत्नागारातून निवड ती कशी करणार ? तरी त्या भांडारातील विविध रत्नांचे काही नमुने मराठी रसिकांच्या नजरेस आणावेत एवढ्याच हेतूने या वचनांची निवड केलेली आहे. 'वचनोद्याना' तील रूपक पुढे चालवून असे म्हणता येईल की त्यातील वचनसुमने आपल्या विविध रंग, रस, गंधांनी रसिकांना सहज आकृष्ट करून तन्मयतेने डोलायला लावणारी आहेत. त्यातील काहींचा हा गुच्छ. अर्थात हीच वचने सर्वोत्कृष्ट असून इतर निकृष्ट आहेत असे मुळीच नाही. वचनांच्या आकार-प्रकारामुळेही या निवडीवर बंधन पडले.

आरंभी अतिशय अवघड वाटलेले हे काम एकदा हाती घेतल्यावर अनेक स्नेही तत्परतेने माझ्या सहाय्यार्थ धावून आल्यामुळे ते सुलभ झाले. मला कन्नड भाषा चांगली समजत असली तरी लिपी चटकन लागत नाही. माझी ही अडचण माझे स्नेही व आमच्या महाविद्यालयातील कन्नडचे प्राध्यापक श्री. राघवेंद्र पटवारी यांनी उत्स्फूर्तपणे दूर केली. त्यांनी वचनांची निवड, त्यांचे देवनागरीत लेखन, या कामी तर सहाय्य केलेच; परंतु अवघड शब्दांच्या अर्थाचा उकलही केला. त्यांचे परिश्रम मोलाचे आहेत. सोलापूरच्या 'जयंती पेपर्स अँड प्रिंटर्स' चे श्री. बाबूराव मैंदर्गीकर यांनी तत्परतेने सुबक मुद्रणाची सोय केली आणि कामास सुरुवात झाली. उत्साहाच्या भरात हे सर्व झाले; परंतु तो पर्यंत प्रकाशक कोण? कवीकडून

अनुवादाची अनुज्ञा मिळविण्याचे काय ? हे प्रश्न मनातही नव्हते. नंतर ध्यानी आले. डॉ. सिद्धय्या पुराणिक यांनी जुना स्नेह जागवून या कामास लगेच अनुज्ञा दिली. प्रेमाने प्रोत्साहन दिले. इतकेच नव्हे तर अत्यंत मोजक्या व मार्मिक शब्दांत कन्नड भाषेतील जुन्या व नव्या वचन–साहित्याचा परिचय करून देत देत माझ्या प्रयत्नाविषयी शुभकामनाही व्यक्त केल्या. त्यांच्या उदार व दिलदार वृत्तीविषयी मी कृतज्ञ आहे. योगायोगानेच 'वचनोद्याना'च्या अनुवादाचे काही मुद्रित खर्डे माझे रसिक स्नेही, ( सरस्वतीभक्त व लक्ष्मीपुत्र ) श्री. विद्याचंद्र कोठारी यांच्या नजरेस पडले. त्यांच्या चौकस वृत्तीने ते चाळले. त्यांना ती वचनें व अनुवादही खूप आवडला आणि कोणत्याही सत्कार्यास सहाय्य करण्यासाठी पुढे सरसावणाऱ्या त्यांच्या सहज स्वभावामुळे त्यांनी बसल्या बैठकीत ह्या अनुवाद ग्रंथाच्या प्रकाशनाची जबाबदारी स्वयंस्फूर्तीने स्वीकारली. फलस्वरूप हा संग्रह रसिकांच्या स्वाधीन केला जात आहे. हे प्रकाशन पूर्वनियोजित, योजनाबद्ध ( Planned ) असे नसल्यामुळे श्री. कोठारींच्या चोखंदळ दृष्टीला ते उत्कृष्ट वाटणार नाही; परंतु या पुस्तकाच्या प्रकाशनानें एका नव्या योजनेला जन्म दिला आहे या गोष्टीचा मला, त्यांना व गुलबर्ग्यातील साहित्यिक वर्तुळातील सर्व रसिकांना आनंद होत आहे. 'विद्याविनय' या प्रकाशन प्रतिष्ठानाचा शुभारंभ या प्रकाशनापासून झाला आहे. प्रकाशकांना माझे शतशः धन्यवाद.

रसिकांच्या हाती दिलेल्या या अनुवादाचे बरे वाईटपण त्यांनीच पारखायचे आहे. या लघु 'वचनोद्याना'तील वचनपुष्पांचे रचना-विचार-सौंदर्य, भाव माधुर्य मूळाबर हुकूम कितपत उतरले आहे ते जाणते ठरवतील. त्यातील उजवेपण मूळ कवीचे, उणेपण मात्र माझ्या तोकड्या अनुवादशक्तीचे द्योतक समजावे.

मुखपृष्ठावरील रेखाटन माझ्या कल्पनेप्रमाणे अल्पावधीत करून दिल्याबद्दल माझे कलागुरुजी, लातूरचे श्री. जी. बी. वारे यांचे शाब्दिक आभार मानण्याने माझ्या मनातील त्यांच्याविषयीचा आदर-भाव पुरतेपणी व्यक्त होऊ शकणार नाही. आमचे संबंध या उपचारापलीकडचे आहेत. विद्यार्थी दशेपासून मी त्यांचा ऋणी आहे. सदैव ऋणी राहीन. या अनुवादाच्या सिद्धतेसाठी अशा रीतीने अनेकांचे साहाय्य झाले आहे. खरे तर त्यांविना हा अनुवाद साधूच शकला नसता. कन्नड कोठारातील धन्याचा हा माल मराठी सदरेवर आणून ठेवण्याच्या कामी ज्यांचा ज्यांचा हातभार लागला आहे, त्या सर्वांचा मी ऋणाईत आहे.

मराठी रसिकांना कन्नड 'वचनोद्याना' तील हा फेरफटका कितपत रुचेल, भावेल यावर संपूर्ण 'वचनोद्याना' चा अनुवाद होणे न होणे अवलंबून राहील. रसिक-अभिप्रायांचा उपयोग पुढील अनुवाद-कार्यात मोलाचा व मार्गदर्शक ठरेल.

'शिवरत्न'
१०-२/३६, एस्.बी.कॉलेज रोड,
गुलबर्गा-५८५१०३.

चंद्रशेखर कपाळे.
दि. २८-११-१९८२

# प्रकाशकाचे मनोगत

मी तसा साहित्यिक, कलावंत असा कोणी नसूनही माझा या ना त्या निमित्ताने साहित्य, संगीत, चित्रकला या क्षेत्रातील काही संस्था, व्यक्ती आणि त्यांच्या कलाकृतींशी संबंध बऱ्याच वर्षांपासून येत गेला. त्यामुळे त्यांची गोडी लागली. या कलांचा आस्वाद घेणे आणि त्यांना प्रोत्साहन देणे हा माझा छंद आहे आणि तो जोपासण्यात मला आनंद आहे.

कोणत्याही व्यक्तीची अभिरुची त्या व्यक्तीवर होणाऱ्या संस्कारावर अवलंबून असते हे सर्वज्ञात सत्य आहे. माझ्या मनोभूमिकेची पाळेमुळे माझ्यावर लहानपणापासून झालेल्या अशा संस्कारांतच आहेत. पदवीधर असलेले माझे ज्येष्ठ बंधुद्वय श्री. माणिकचंद्रजी व श्री. प्रकाशचंद्रजी या दोघांची 'विद्या'प्रेमाची प्रात्यक्षिके तर माझ्यासमोर होतीच; परंतु नूतन विद्यालयासारख्या राष्ट्रीय वृत्तीचे सुशिक्षण देणाऱ्या संस्थेतील आदरणीय गुरुजन श्री. बा. गो. दाते व श्री वि. पां. देऊळगावकर यांच्यासारख्या आदर्श शिक्षकांनी माझ्या अभिरुचीला लावलेले वळण हे मी अत्यंत मोलाचे मानतो. ह्या सर्वांच्या शिकवणुकीतूनच माझी आवडनिवड सिद्ध झालेली आहे.

या माझ्या आवडीच्या पार्श्वभूमीवर मी जेव्हा गुलबर्गा येथील साहित्यिक व कलात्मक वातावरणाचा विचार करु लागतो, त्यावेळी या भागातील अनेक साहित्य-कलाप्रिय व्यक्तींच्या ठिकाणी सुप्त

असलेली निर्मागक्षमता ( Creative Potentiality ) मला छेडू लागते. परंतु हैदराबाद संस्थानच्या काळापासून मागासलला म्हणविला जाणाऱ्या या भागातील सुप्त प्रतिभेला कधी मुक्तपणे प्रकट होण्याची, विकसण्याची संधी अभावानेच लाभली असावी.

या भागातील कलावैभवाचा साद्यंत इतिहास येथे सांगण्याची गरज नाही. परंतु संस्थानी राजवटीच्या प्रतिकूल परिस्थितीतही चित्रकलेच्या क्षेत्रात कै. शंकरराव आळंदकर, श्री. एस्. एम्. पंडित आणि कै. कुमार चंद्रशेखर यांच्यासारखी अखिल भारतीय कीर्तीची कलावंत मंडळी निर्माण झाली. संगीताच्या क्षेत्रात कै. अवधूतबुवा पुजारी व कै. पांडुरंगराव पत्की यांनी आपली शिष्यपरंपरा निर्माण करून ठेवली आहे. दखनीचे अत्यंत लोकप्रिय कवी पै. सुलेमान खतीब याच शहरातले. हा अगदी ताजा इतिहास आहे.

भाषिकदृष्ट्या गुलबर्गा आणि आसपासचा परिसर वैशिष्ट्यपूर्ण असा आहे कन्नड ही येथील मुख्य भाषा असली तरी मराठी, उर्दू, हिंदी, तेलुगु, तमिळ, गुजराती असे अन्य भाषिकही मोठ्या संख्येने येथे वसलेले आहेत. त्यांचा परस्परसंबंध अनेक शतकांचा. त्यामुळे परस्परांच्या भाषांवर, आचार-विचारांवर, चालीरीतीवर कळत नकळत एकमेकांचे संस्कार होणारच ! अशा या बहुभाषासरितांच्या संगमतीर्थावर संस्कृतिसमन्वयाच्या इंद्रधनुष्याचे मनोहर दृश्य नेहमीच पाहाण्यात आले परंतु अलिकडे काही राजकीय निर्णयांचे सादपडसाद येथेही उठत असल्यामुळे या सुरेख संगमावरही क्षणकालिक का होईना, अशांततेची वादळे उठलेली दिसतात. मात्र या वरवरच्या अस्थिर तरंगांखाली परस्परसामंजस्याचा धीरगंभीर प्रवाहच

वाहात असलेला आढळतो. या स्थायीभावाचे ज्यात चित्रण झालेले असेल, ज्यात येथील जनजीवनाचे खरेखुरे प्रतिबिंब उमटलेले असेल असे साहित्य येथे नांदत असलेल्या भिन्न भिन्न भाषांतून निर्माण व्हावे,त्याचे आदान प्रदान व्हावे अशी माझी तळमळ आहे. या भिन्न भाषांच्या संस्था-संघटना गुलबर्गा शहरात आहेतच. परंतु त्यांच्याकडून साहित्यनिर्मितीच्या क्षेत्रात अजून तरी लक्षणीय असे कार्य घडले असल्याचे दिसत नाही. कन्नडचे डॉ. म. गु. बिराजदार, शांतरस, चंद्रकांत कुसनूर, गीरेड्डी, इंग्रजीचे डॉ. गुप्ता, हिंदीचे केशव महागावकर, मराठीचे डॉ. भीमाशंकर देशपांडे अशी काही मंडळी आपापल्या भाषेत व क्वचित अन्य भाषेतही लेखन करीत असलेली दिसते. परंतु परस्परअनुवाद व आदानप्रदानाचे कार्य अगदीच अल्प आहे. ते वाढले पाहिजे. सांस्कृतिक व भावनिक एकात्मतेची निकड असलेल्या काळात तरी या बाबतीत जाणीवपूर्वक प्रयत्न होणे अगत्याचे वाटते.

अशा विचारांच्या भूमिकेतच मी माझे स्नेही प्रा. चंद्रशेखर कपाळे यांच्या घरी गेलो असता, त्यांचे 'वचनोद्यान'चे अनुवादकार्य पाहाण्याचा योग आला. कुतूहलाने काही पाने चाळली. काही शब्दांविषयी त्यांच्याशी चर्चाही केली. जुन्या वचन साहित्यप्रकारातील नव्या विचारांची ही मूस मला अभिनव वाटली. आणि मग माझ्या स्वभावानुसार प्रकाशनाच्या व्यावहारिक अंगाचीही मी चौकशी केली. तेव्हा ध्यानी आले की, या बाबतीत कसलीही योजना न आखता हे काम चाललेले आहे परंतु त्या पाठीमागचा हेतू माझ्या विचारांशी, कल्पनांशी जुळणारा वाटला आणि मी 'वचनोद्याना'च्या प्रकाशनाची जबाबदारी पत्करली. ह्या घटकेपर्यंत 'वचनोद्यान'चे अर्धेअधिक मुद्रणकार्य पार पडले होते. त्यामुळे एक मात्र चुटपूट लागून राहिली. त्या पुस्तकाला माझ्या कल्पनप्रमाणे अधिक आकर्षक स्वरूपात सादर करणे

हे आटोक्याबाहेर गेले होते. कदाचित् आर्थिक बाजूचा अधिक विचार करून माझ्या मित्रांनी काटकसरीने त्याचे आकारमान ठरविले असावे ! असो आहे ते अधिकात अधिक चांगले करून रसिकांच्या स्वाधीन करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे.

या पुस्तकाच्या प्रकाशनाने आणखी एका कल्पनेला मूर्त रूप येत आहे, याचाही विशेष आनंद वाटतो. 'विद्याविनय प्रतिष्ठान'ची कल्पना माझ्या मित्रांनी बोलून दाखविली. या योजनेत गुलबर्गा परिसरातील कोणत्याही भाषेतील एक उत्कृष्ट ग्रंथ प्रतिवर्षी या प्रतिष्ठानच्या वतीने प्रकाशित करण्याचा विचार आहे. त्या योजनेची सविस्तर रूपरेषा तयार होईल त्याकामी मला जाणकारांचे, माझ्या गुरुजनांचे व स्नेह्यांचे सहाय्य घ्यावे लागेल. परंतु या योजनेमुळे या भागातील इतके दिवस दबून दडपून राहिलेल्या सुप्तगुप्त प्रेरणांना, प्रतिभेला प्रकट होण्यास वाव मिळेल व ते या भागातील साहित्यिक, सांस्कृतिक समन्वयाला, सामंजस्य भावना वाढीस लावण्याला उपकारक ठरेल अशी दृढ आशा वाटत आहे.

या अनुवादग्रंथाविषयी मी काही निराळे लिहावे असे नाही. खुद्द कवी डॉ. सिद्धय्या पुराणिक आणि अनुवादक प्रा. चंद्रशेखर कपाळे यांनी त्याविषयी आपापल्या भूमिका विशद केल्या आहेतच. मला मूळ वचने आणि त्यांचा अनुवाद दोन्हीही आवडले; म्हणूनच हा प्रकाशन प्रपंच हे आमचे पहिलेच अपत्य. ते रसिकांच्या कौतुकास पात्र झाले तर आमच्या पुढील योजनेस प्रोत्साहन लाभेल, एवढेच मी येथे सुचवू इच्छितो.

—विद्याचंद्र कोठारी

दि. १०-१२-१९८२.

'विद्याविनय'
ब्रह्मपूर रोड, गुलबर्गा-२.

## -एक-

नीनु हरी, नीनु हर,
नीनु सिद्ध, नीनु बुद्ध,
नीनु योव्ह, नीनु मज्द,
नीनु तावो, नीनु देव,
नीनु अल्ला, नीनु एल्ला,
नीनु सार्वनामिक, नीनु अनामिक,
नीनु सर्वगत, नीनु सर्वभरित,
नीनु अनुपमेय, नीनु निरामय,
नीनु स्वतंत्रधीर सिद्धेश्वर !

तूच हरी, तूच हर,
तूच सिद्ध, तूच बुद्ध,
तूच योव्ह, तूच मज्द,
तूच सर्व, तूच शर्व,
तूच अल्ला, तूच देव,
तूच सार्वनामिक, तूच अनामिक,
तूच सर्वगत, तूच सर्वभरित,
तूच अनुपमेय, तूच निरामय,
तूच स्वतंत्रधीर सिद्धेश्वर !

– ( वचन क्र. ८ ) –

## - दोन -

नन्न तायि भूमि,
नन्न तंदे व्योम;
हुट्टिद इवेरडक्कू
हुट्टिद नीने तंदे तायियय्या–
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

भूमी माझी माता,
व्योम माझा पिता;
या दोघांपोटी जन्मलेला
जन्मलेला तूच माझी माता, पिता वा–
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

–( वचन क्र. ११ )–

## - तीन -

सर्वोद्धारद विचारगळ प्रचारवे पुण्य
शोषक-पोषक विचारगळ प्रचारवे पाप–
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

सर्वोद्धाराच्या विचारांचा प्रचारच पुण्य
शोषक-पोषक विचारांचा प्रचारच पाप–
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

–( वचन क्र. ३२८ )–

## - चार -

नानु नीनागुवुदु
ननगे साध्यवागलिल्ल;
नीनु नानागुवुदु
निनगू साध्यवागलिल्लवेनय्या ?
नन्नल्लिरुव निन्ननु
केळगोत्तिहनु नानेम्ब असुर !
अवनन्नु केळगोत्ति मेट्टी
नीनु नानागय्या –
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

मी, तू होणे
साध्य न झाले मला;
तू, मी होणे
तुलाही साध्य व्हावे न काय बा ?
माझ्यातल्या तुला
दाबितो खाली अहंमन्यासुर !
त्यालाच दडपून खाली
तू मी होई बा–
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

–( वचन क्र. १५ )–

## - पाच -

हसिवे यत्त, अशनवेत्त ?
एरडू सेरे सन्तसवय्या !
कत्तले यत्त, बेळकेत्त
एरडू सेरे संभ्रमवय्या !
रोग वेत्त, औषधवेत्त ?
एरडू सेरे आरोग्यवय्या !
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
नानेत्त नीनेत्त ?
इब्बरू सेरे आनंदवय्या !

भूक कुठे, अन्न कुठे ?
दोन्ही मिळती जेथे तृप्ती वसे तेथें !
अंधार कोठे, प्रकाश कोठे ?
दोन्ही मिळता संतोष दाटे !
रोग कुठे, औषध कोठे ?
दोन्ही मिळता आरोग्य भेटे !
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
मी कोठे, तू कोठे ?
दोघे मिळता आनंद लोटे !

-( वचन क्र. १७ )-

## – सहा –

तायियागि कंडे,
तंदेयागि कंडे,
गुरुवागि कंडे,
अरिवागि कंडे,
तरुवागि, गिरियागि, दरियागि कंडे,
मगुवागि, मिगवागि, खगवागि कंडे,
जलवागि, स्थलवागि, वियत्तलवागि कंडे !
एनेनागि कंडे, एनेनागिकाणलिल्लवय्या नीनु ?
अनन्त रूपगळलिल नीनु कंडू काणेवेम्बुदु
कण्णिद्दू काणदवर वाणियेय्या–
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

माता होऊन दिसला,
पिता होऊन दिसला,
गुरु होऊन दिसला,
ज्ञान होऊन दिसला,
तरु होऊनि, गिरि होऊन, दरी होऊन दिसला,
खग होऊन, मृग होऊन, मूल होऊन दिसला,
जल होऊनि, स्थल होऊनि, विश्वरूप दिसला !
काय काय होऊन दिसला, काय काय होऊन
दिसला नाहीस तू ?
अनंतरूपी दिसताही तू, दिसत नाहीस म्हणती तया
डोळे असूनही अंध म्हणावे बा–
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

–( वचन क्र. २२ )–

# - सात -

काश्मीरदिंद कन्याकुमारियवरेगिन
ई सुंदर सुमनोहर वनवन्नु
जातिउपजाति उप उपजातिगळ
कोतिगळिगागि हुट्टिसिहे एनय्या ?
कोनुरत्तले कडिदोगेयुत्तिवे
प्रतिभेय कुडिगळन्नु;
अरळुव मोदले कित्तेसेयुत्तिवे
सविभावगळ हूगळन्नु;
हण्णागुवमोदले गीरि तूरुत्तिवे
ऋतुशक्तिय कायिगळन्नु !
बनविदु बेळेयुव बगे यावुदय्या ?
उळियुव परियावुदय्या ?
इवुगळन्नेल्ल करेदोय्दु
कडलिगे तळ्ळबल्ल
किन्दरि जोगियोब्बन कळिसय्या–
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत
हे सुंदर सुमनोहर उपवन
जाति उपजाति उप उपजातींच्या
मर्कटांसाठीच निर्मिलेस काय बा ?
मोहरता क्षणीच तोडताहेत
प्रतिभेचे कोंभ;
उमलण्यापूर्वीच खुडताहेत
सुमधुरभाव सुमने;
पिकण्यापूर्वीच टोकरताहेत
ऋतुशक्तीची हिरवीकंच फळे !
उपवन जोपासण्याची ही कोणती रीत बा ?
संरक्षिण्याची ही कोणती तऱ्हा बा ?
या सर्वांना बोलावून नेऊन
समुद्रात लोटून देणारा
एखादा पुंगीवाला धाडून देई बा–
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

–( वचन क्र. ३९ )–

# – आठ –

'भारत–कर्नाटक'
इदु नन्न सप्ताक्षरी मंत्रवय्या;
'कन्नड–वसव'
इदु नन्न षडक्षरी मंत्रवय्या;
'सत्य–सौंदर्य'
इदु नन्न पंचाक्षरी मंत्रवय्या;
'प्रीति–नीति'
इदु नन्न चतुरक्षरी मंत्रवय्या;
'जनते'
इदु नन्न त्र्यक्षरी मंत्रवय्या;
'काव्य'
इदु नन्न द्वयक्षरी मंत्रवय्या;
'नी'
इदु नन्न एकाक्षरी मंत्रवय्या–
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

'भारत–कर्नाटक'
हा माझा सप्ताक्षरी मंत्र बा;
'कन्नड–वसव'
हा माझा षडक्षरी मंत्र बा;
'सत्य–सौंदर्य'
हा माझा पंचाक्षरी मंत्र बा;
'प्रीति–नीति'
हा माझा चतुक्षरी मंत्र बा;
'जनता'
हा माझा त्र्यक्षरी मंत्र बा;
'काव्य'
हा माझा द्वयक्षरी मंत्र बा;
'तू'
हा माझा एकाक्षरी मंत्र बा–
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

–( वचन क्र. ४२ )–

- नऊ -

निन्न नरियुवुदिरली
नन्नने अरियरे
काल कळेदेनय्या !
नन्न नरितिट्टरे
निन्न नरियदिरुत्तिद्देने ?
तन्न नरियरिदात्त
इन्नेननू अरियनेंदात–
स्वतंत्रधीर सिद्धेश्वर !

तुला जाणणे तर दूरच
मी मलाही न ओळखता
किती तरी काळ गमावला !
मी मलाच ओळखले असते तर
तुला ओळखू शकलो नसतो का ?
जो स्वतःलाच ओळखत नाही
तो काहीच जाणत नाही म्हणे–
स्वतंत्रधीर सिद्धेश्वर !

–( वचन क्र. ४९ )–

## – दहा –

आग बेकू, आग बेकू–
एनेनो आगदे
तानुतानागबेकु !
नाल्कु जनरिगे आगबेकु;
अदिरु अपरंजियागबेकु;
प्रकृति संस्कृतियागबेकु;
अन्नमय आनंदमयवागबेकु;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
नानु नीनो, नीनु नानो,
एनो आगबेकु !

झाले पाहिजे, झाले पाहिजे–
काही न होताही
आपोआप झाले पाहिजे !
चार लोकांसाठी झाले पाहिजे;
खनिज सुवर्ण झाले पाहिजे;
प्रकृति संस्कृति झाली पाहिजे;
अन्नमय आनंदमय झाले पाहिजे;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
मी तू, तू मी,
काही झाले पाहिजे !

–( वचन क्र. ५१ )–

## - अकरा -

यारु नन्निंद दूरादरू
नानु नन्निंद दूरवागदंतिरिसय्य;
यारु नन्नल्लिगे बारदिद्दरू
नानु नन्नल्लिगे बरुवंते करुणिसय्य;
यारु नन्नन्नु नंबदिद्दरू
नानु नन्नन्नु नंबुवंते माडय्य;
यारु नन्नन्नु अरियदिद्दरू
नानु नन्नन्नु अरियुवंते अनुग्रहिसय्य;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
नानु नानागि नीनागुवंते आशीर्वदिसय्य!

कोणी माझ्यापासून दुरावले तरी
मला माझ्यापासून दुरावू देऊ नकोस बा;
कोणी माझ्याजवळ आले नाही तरी
मी माझ्याजवळ यावे अशी करुणा कर बा;
कोणी माझ्यावर विश्वास ठेवला नाही तरी
मी माझ्यावर विश्वास ठेवीन असे कर बा;
कोणी मला समजून घेतले नाही तरी
मी मला समजावे असा अनुग्रह कर बा;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
माझा मी राहून तू होईन असा आशीर्वाद देई बा!

-( वचन क्र. ५२ )-

## – बारा –

नन्न ननसिन नौकेगे
नीने नाविकनागय्या;
नन्न कनसिन पुष्पकक्के
नीने चालकनागय्या;
नन्न मनसिन विळियानेगे
नीने मावुतनागय्या;
नन्न कामनेय कुदुरेगे
नीने रावुतनागय्या;
नन्न कल्पनेय क्षिपणिगे
नीने नियन्त्रकनागय्या;
नन्न तनु-मन-प्राण जीवन
चिंतन अंतर्मंथनगळिगे
नीने आधार, नीने आश्रयवागिरय्या–
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा!

माझ्या वास्तवाच्या नौकेचा
तूच नाविक होई बा;
माझ्या स्वप्नाच्या पुष्पकाचा
तूच चालक होई बा;
माझ्या मनाच्या मतंगजाचा
तूच माहुत होई बा;
माझ्या कामनेच्या अश्वाचा
तूच राऊत होई बा;
माझ्या कल्पनेच्या क्षेपणास्त्राचा
तूच नियन्त्रक होई बा;
मम तनु-मन-प्राण जीवन
चिंतन अंतर्मंथनादींचा
तूच आधार, तूच आश्रय होऊन राही बा –
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

–( वचन क्र. ५७ )–

## - तेरा -

यारिगे बेकागि येनु फल तंदे–
निनग बेकागदनक ?
यारु मेच्चि येनु प्रयोजन तंदे –
निनगे मेच्चुगेयागदनक ?
याव आस्थान दलि स्थान पडेदु याव लाभ तंदे-
निन्न वात्सल्यदास्थान दलि स्थल पडेयदनक?
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
याव मतविडिदु येनु फल तंदे,
निन्न पथ तोरदनक ?

कुणाला हवासा होऊन काय फळ –
तुला हवासा झालो नाही तर ?
कुणाला प्रिय होऊन काय प्रयोजन –
तुला प्रिय झालो नाही तर ?
कुण्या स्थानी स्थानापन्न होऊन काय लाभ –
तुझ्या वात्सल्यस्थानी स्थळ मिळाले नाही त
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
कोण्या मताचे काय फळ,
तुझा पथ दाखविणारे नसेल तर ?

–( वचन क्र. ५८ )–

## - चौदा -

निन्न शक्ति हिरिदो, नन्न भक्ति हिरिदो –
ओ सर्वशक्त ?
निन्न ज्ञान हिरिदो, नन्न ध्यान हिरिदो –
ओ सर्वज्ञ ?
निन्न विश्वतनु हिरिदो, नन्न सण्ण मन हिरिदो–
ओ सर्वभरित ?
नीनित्त प्राण हिरिदो, नन्न निर्माण हिरिदो –
ओ स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

तुझी शक्ती श्रेष्ठ की माझी भक्ती श्रेष्ठ –
हे सर्वशक्ता ?
तुझे ज्ञान श्रेष्ठ की माझे ध्यान श्रेष्ठ –
हे सर्वज्ञा ?
तुझी विश्वतनु श्रेष्ठ की माझे सान मन श्रेष्ठ –
हे सर्वभरिता ?
तू दिलेला प्राण श्रेष्ठ की माझे निर्माण श्रेष्ठ –
हे स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा ?

–( वचन क्र. ६० )–

निन्न अनुग्रहक्के नानु पात्रनागबेकेन्दु
बोधिसुत्तिहरय्या वल्लवरु !
नानु क्षात्रनादरे पात्रतेगे तक्क फल
नन्न हक्कु!
निन्न अनुग्रहवेल्लि बंतु अदरल्लि ?
निन्न अनुग्रहविरुवदु अपात्ररिगागि,
नन्नंथवरिगागियेन्नुवरु आद्यरु !
निन्न अनुग्रहक्कू अर्हतेगळ विधिसुवदे -
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा ?

तुझ्या अनुग्रहास मी पात्र व्हावे म्हणून
उपदेश करताहेत बा ज्ञानीजन !
मी क्षात्र झालो तरी पात्रतायोग्य फळ
हा माझा हक्क !
तुझा अनुग्रह कोठे आला त्यात ?
तुझा अनुग्रह असायचा अपात्रासाठी
माझ्यासारख्यांना म्हणणार पूर्वसूरी !
तुझ्या अनुग्रहास्तव पात्रतेचे नियम ढाळायचे-
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा ?

–( वचन क्र. ६३ )–

## - सोळा -

बुद्धिय बदरिय दारियल्लि
ओम्मोम्मे हिमपात, ओम्मोमे शिखरपात,
हलवु हन्नेरडु अपघात !
हृदय-केदारद हादियल्लि
ओम्मे नेरेहावळि, ओम्मे बिरुगाळि
अनिवार्य विघ्नावळि !
मनद मानस सरोवरद मार्गदल्लि
परकीय प्रभावगळ काट,
प्रतिकूलगळ कूट !
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
नानु नानागुव पथदल्लि
हलवु उपाधिगळ, मनोव्याधिगळ बाधे !

बुद्धीच्या बदरी - मार्गात
कधी हिमपात, कधी शिलापात,
सत्राशे साठ अपघात !
हृदय–केदार–मार्गात
कधी पूर, कधी झंझावात,
अनिवार्य विघ्ने त्यात !
मनाच्या मानस सरोवर–मार्गात
परकीय प्रभाव कटकट
प्रतिकूलाशी झटापट !
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
माझा मी होण्याच्या मार्गात
किती उपाधी, किती मनोव्याधींची बाधा !

–( वचन क्र. ६६ )–

सत्यान्वेषणेय हादियल्लि तुळिद
मुळ्ळू मल्लिगेये !
मिथ्यादरणेय दारियल्लि तुळिद
मल्लिगेयू मुळ्ळे !
सत्यरक्षणेय होराटदल्लि पडेद
सोलू गेलवे !
मिथ्यानुमोदनेय कीळाटदल्लि पडेद
गेलवू सोले !
नीनु सत्यस्वरूप मात्रवल्ल,
सत्यवे नीनु, नीने सत्य !
ई सत्यदल्लि सेरि बयलागलि–
नानेंबुव मिथ्य,
स्वतंत्रधीर सिद्धेश्वर !

सत्यान्वेषणाच्या मार्गात तुडविलेले
काटेही जाईजुईच !
मिथ्यादराच्या मार्गात तुडविलेली
जाईजुईही काटेच !
सत्यरक्षणार्थी युद्धात मिळालेला
पराजयही विजयच !
मिथ्यानुमोदनार्थी हुल्लडीत मिळालेला
विजयही पराजयच !
तू केवळ सत्यस्वरूपच नाहीस !
सत्यच तू, तूच सत्य !
या सत्यात सामावून शून्य होऊ दे–
मीपणाचे मिथ्य,
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

–( वचन क्र. ६७ )–

## - अठरा -

गाळि बीसिदत्त हुट्टु हाकिदरे
हरिगोलु उळियवहुदागलि गुरि निलुकदय्या;
दारि चेन्नागिदेयंदु तप्पुदारि तुळिदरे
दारि सागवहुदागलि ऊर सेरलागदय्या !
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
सुलभवादुदेल्ला शुभकरवल्ल,
कठिनवादुदेल्ल कष्टपरवल्लवय्या !

वाऱ्याच्या दिशेने वल्ही मारली तर
नाव वाचेल परंतु ध्येय हाती लागणार नाही;
मार्ग चांगला म्हणून चुकीचा मार्ग,चोखाळला तर
मार्ग सरेल परंतु गाव लागणार नाही बा !
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
सुलभ असलेले सर्व शुभंकर नसते,
कठीण असलेले सर्व कष्टप्रद नसते बा !

–( वचन क्र. ७० )–

## -एकोणीस-

ओंदु कोहिनूरिगागि
हलवु गणिगळनगिदरू
व्यर्थवल्लवय्या;
ओंदु होस विचारक्कागि
हलवु होत्तगेगळ मगुचिदरू
हाळेनल्लवय्या;
ओब्ब सीतादेविगागि
महायुद्ध माडिदरू;
केडेनल्लवय्या;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
निन्नोंदु कृपाकटाक्षक्कागि
नूर वर्ष नवेदरू
नष्टवेनल्लवय्या !

एका कोहिनूरासाठी
अनेक खाणी खोदल्या तरी
व्यर्थ नाही बा;
एका नवविचारासाठी
अनेक ग्रंथ उलथले तरी
बिघडत नाही बा;
एका सीतादेवीसाठी
महायुद्ध केले तरी
वाईट नाहो बा;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
तुझ्या एका कृपाकटाक्षासाठी
शंभर वर्षे वेचली तरी
हानी नाही बा !

-( वचन क्र. ७३ )-

## - वीस -

नेलदल्लि होगद नेगिलिगे नेले एल्लि ?
अनुभाववन्नु आश्रयिसद अरिविगे नेले एल्लि ?
कल्लिनल्लि कंडरिसिद वरतेगे सेले एल्लि ?
होलेयल्लि हुट्टिद जीविगे होले एल्लि ?
आकाशद कोप्परिगेगे ओले एल्लि ?
बयल मत्स्यव हिडिये बले एल्लि ?
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा, निन्न निरासकरिसि,
नानिरबल्लेनेंदरे
कडलबिट्टु अले एल्लि ?

जमिनीत न धसणाऱ्या नांगराचे मोल कुठे ?
अनुभवाच्या आधाराविना ज्ञानाचा ठाव कुठे?
पाषाणात दिसलेल्या झऱ्याचा उगम कोठे ?
घाणीत जन्मलेल्या जीवाला घाण कोठे ?
आकाशाच्या कढईला चूल कोठ ?
शून्याच्या माशाला धरण्यास जाळे कोठे ?
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा, तुला टाळून,
मी राहीन म्हटले तर
समुद्राला सोडून लाट कोठे ?

-( वचन क्र. ७५ )-

## - एकवीस -

तंतिगळल्लि सुनादविदे –
सोरेदंडिगे गळिगे बिगिदाग मात्र;
चर्मदल्लि सुनादविदे–
वाद्यगळ मै गळिगे बिगिदाग मात्र;
विल्लिनल्लि बाण बिडुव शक्तियिदे –
नारियिंद बिगिदाग मात्र;
नन्नल्लियू निन्ननरिव शक्तियिदे –
निन्नडिगळिगे नन्न बिगिदाग मात्र;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वर !

तारांमध्ये सुनाद आहे –
तंबोऱ्याच्या खुंट्यांवर ताणल्यावर मात्र;
चामड्यामध्ये सुनाद आहे –
वाद्याच्या मुखावर मढविल्यावर मात्र;
धनुष्यामध्ये बाण सोडण्याची शक्ती आहे –
प्रत्यंचेने बांधल्यावर मात्र;
माझ्यामध्येही तुला जाणण्याची शक्ती आहे –
तुझ्या चरणांशी मला बांधल्यावर मात्र;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

–( वचन क्र. ७६ )–

## - बावीस -

लोक नन्नन्नु मरेयलि,
इन्नेनन्नादरू मरेयलि –
निन्नन्नु मरेयदिरलि, निन्नन्नु मरेयदिरलि !
जन नन्नन्नु जरेयलि,
इन्नेनन्नादरू जरेयलि –
निन्नन्नु जरेयदिरलि, निन्नन्नु जरेयदिरलि !
जनांग नन्नन्नु तोरेयलि,
इन्नेन नन्नादरू तोरेयलि –
निन्नन्नु तोरेयदिरलि, निन्नन्नु तोरेयदिरलि !
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !
लोक विरोधिय
लोकदवरू ओलियलि, बिडलि –
लोकेश्वरनाद निन्न ओलियलय्या !

लोक मला विसरू देत,
आणखी काहीही विसरू देत –
तुला विसरू नयेत, तुला विसरू नयेत !
जन माझी अवहेलना करू देत –
आणखी कशाचीही अवहेलना करू देत –
तुझी अवहेलना करू नयेत, तुझी अवहेलना करू नयेत!
समाज मला दूर लोटू दे
आणखी काहीही दूर लोटू दे –
तुला दूर लोटू नये, तुला दूर लोटू नये !
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
लोकविरोधी
लोकांना आवडो वा न आवडो –
लोकेश्वर असलेला तू आवडो वा !

–( वचन क्र. ८३ )–

# – तेवीस –

मैय रातिय तिरुहि
मूगिन कदिरिर्निद
उसिरनूलु नूलुतिहुदय्या काणद कै !
आयुष्यद कुक्कडी तुंबुत्त नडेदिद;
तुंबुव मोदले एळे हरिवुदो
हंजि मुगिवुदो
नीने बल्लेयय्या, स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

शरीराचा चरखा फिरवून
नाकाच्या टकळीवर
श्वासाचे सूत कातीत आहेत बा अदृश्य हात!
आयुष्याचे रीळ भरत चालले आहे;
भरण्यापूर्वी धागा तुटणार की
पेळू संपणार
तूच जाणे बा, स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

–( वचन क्र. ८४ )–

## - चोवीस -

निन्ननरिवुदे स्वर्ग, निन्न मरेयुदे नरक;
निन्न नेनहे जीवन, निन्न मरहे मरण;
नीनेंबुदे पुण्य, नानेंबुदे पाप;
एल्ल निन्निंद एंबुदे सत्य,
नन्निंद एंबुदे मिथ्य;
ननगागि माडिदरे बंधन,
निनगागि, निन्नवरिगागि माडिदरे निर्बंधन;
नीनल्लदिल्लवेंबुदे ज्ञान,
इदेयेंबुदे अज्ञान;
निन्नन्नु निनगागि प्रीतिसुवुदु भक्ति,
निन्नन्नु ननगागि प्रीतिसुवुदु रक्तियय्या –
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

तुला जाणणेच स्वर्ग, तुला विसरणेच नरक;
तुला स्मरणेच जीवन, तुला विस्मरणेच मरण;
तू म्हणजेच पुण्य, मी म्हणजेच पाप;
सर्व तुझ्यामुळेच म्हणणे सत्य,
माझ्यामुळे म्हणणेच मिथ्य;
माझ्यासाठी केले तर बंधन.
तुझ्यासाठी,तुझे असणाऱ्यासाठी केले तर निर्बंधन;
तुझ्याशिवाय काही नाही म्हणणे हेच ज्ञान,
आहे म्हणणेच अज्ञान;
तुझ्यासाठी तुझ्यावर प्रेम करणे ही भक्ती;
माझ्यासाठी तुझ्यावर प्रेम करणे ही रक्ती वा –
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

–( वचन क्र. ८५ )–

शब्द पडेदुदु स्वल्प,
पडेयदिद्दुदु वहळवय्या;
अर्थ तोरुवुदु स्वल्प,
तोरदिरुवुदु वहळवय्या;
जीवि अरियुवुदु स्वल्प,
अरियदिरुवुदु बहळवय्या;
नीनु मात्र बेडुवुदु स्वल्प,
नीडुवुदु वहळवय्या –
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

शब्द साधलेले अल्प,
असाध्य अमाप बा;
अर्थ व्यक्त थोडा,
अव्यक्त फार बा;
जीवाला ज्ञात थोडे,
अज्ञात बहुत बा;
तू अपेक्षिलेले अल्प,
ओपिलेले अमाप बा;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

–( वचन क्र. ८६ )–

## – सव्वीस –

हेणेद हूगळु हलवादरू हार ओंदे,
पवणिसिद मणिगळु हलवादरू दार ओंदे,
हालु करेद हसुगळ बण्ण हलवादरू क्षीर ओंदे,
होत्तुदु होन्नागलि, मण्णागलि भार ओंदे,
कडलिन हेसरेने इरली, क्षार ओंदे,
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा, प्रार्थिसुव, यजिसुव,
भजिसुव रीति नूरादरू उद्धार ओंदे !

माळलेली फुले विपुल तरी माला एकच,
ओवलेले मणी विपुल तरी धागा एकच;
दोहिलेल्या गाईंचे रंग भिन्न तरी दूध एकच,
गाठोडे सोन्याचे असो वा मातीचे ओझे एकच,
समुद्राचे नाव काहीही असो, मीठ एकच,
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा, भजन, पूजन, यजन,
प्रार्थनेच्या रीती किती, तरी उद्धार एकच !

–( वचन क्र. ८९ )–

## - सत्तावीस -

नन्न बाळिन वानिनल्लि,
बुद्धिये भानु, श्रद्धेये शशियागलय्या;
श्रद्धे सूर्यनागी बुद्धि चंद्रनागदिरलय्या,
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

माझ्या जीवनाच्या आकाशात,
बुद्धीच सूर्य, श्रद्धाच शशी होत बा,
श्रद्धा सूर्य होऊन बुद्धी चंद्र होत नाही वा,
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

-( वचन क्र. ९१ )-

## - अट्ठावसि -

इदिरु काणदवरेगे
कुरुहिगे कै मुगिदे;
काणदादाग
ननगे ना नमस्करिसिदे-
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

समोर दिसेपर्यंत
प्रतीकांना हात जोडले;
दिसेनासे झाल्यावर
मलाच मी नमस्कारिले -
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

-( वचन क्र. ९४ )-

## - एकोणतीस -

अपराधी अंतःसाक्षियिरे
कायवे कारागार,
इल्लदिरे, शरीरवे श्रीगिरि नोडा,
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

अपराधी अंतःसाक्षी असेल तर
शरीरच कारागार,
नसता, शरीरच श्रीगिरी पाहा,
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

–( वचन क्र. ९६ )–

## - तीस -

तेरेयोंदरिंद तोरेयागदु निज;
आदरे, तेरेयिल्लद तोरेयू वुंटेनय्या ?
तोरेयल्लि मात्र तेरेगे अस्तित्व;
तेरेइंद तोरेगे वहनत्व,
एरडरोळू एरडु इवे– द्वित्व एकत्व!
नाने तेरें, नीने तोरे,
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

एका तरंगाने प्रवाह होत नाही हे खरे;
तरी तरंगाविना प्रवाह आहे का बा?
प्रवाहातच तरंगाचे अस्तित्व;
तरंगामुळेच प्रवाहाचे वहनत्व,
एकमेकात दोघेही– द्वित्व एकत्व!
मी तरंग, तूच प्रवाह,
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

–( वचन क्र. ९८ )–

विद्ये बंतु, विनय होय्तु;
बुद्धि बंतु, श्रद्धे होय्तु,
श्रद्धे बंतु, विवेचने होय्तु,
समृद्धि बंतु, संस्कृति होय्तु ;
विज्ञान बंतु, समाधान होय्तु;
शरीर स्वास्थ्य बंतु, चित्त स्वास्थ्य होय्तु;
दीर्घायुष्य बंतु, जीवन स्वारस्य होय्तु;
बोधने बंतु, साधने होय्तु;
मातु बंतु, कृति होय्तु;
जाति बंतु, प्रीति होय्तु;
स्वातंत्र्य बंतु, सौजन्य होय्तु;
सिद्धय्या पुराणिक बंद।
स्वतंत्रधीर सिद्धेश्वर होद !

विद्या आली, विनय गेला;
बुद्धी आली, श्रद्धा गेली;
श्रद्धा आली, विवेचकता गेली;
समृद्धी आली, संस्कृती गेली;
विज्ञान आले, समाधान गेले;
शरीर स्वास्थ्य आले, चित्त स्वास्थ्य गेले;
दीर्घायुष्य आले, जीवन स्वारस्य गेले;
शिकवण आली, साधना गेली;
उक्ती आली, कृती गेली;
जाती आली, प्रीती गेली;
स्वातंत्र्य आले, सौजन्य गेले;
सिद्धय्या पुराणिक आला,
स्वतंत्रधीर सिद्धेश्वर गेला !

–( वचन क्र. १०० )–

## -बत्तीस-

हलवु मसिगळ हीरि हण्णाद
ओत्तु करडु नानय्य !
निन्नडिय मुद्रे धरिसे
एडेयू इल्ल, दृढवू इल्ल इल्लि;
हलवु बण्णगळ नुंगियू बण्ण गेट्ट
ई बड ओत्तु करडु
हरळय्यन तोडेय चर्मवागवल्लुदेनय्या—
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा ?

विविधरंगी शाई टिपून विरलेला
टीपकागद मी बा !
तुझ्या चरणांचा ठसा धरण्यास
जागा नाही, इथे दृढताही नाही;
अनेक रंग पिऊन बेरंगी झालेला
हा विचारा टीपकागद
हरळय्याच्या मांडीचे चर्म होऊ शकेल काय बा—
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा ?

—( वचन क्र. १०२ )—

## - तेहतीस -

कवनक्के कारण नानु तानेंदु
कागद मसि कडिदाडिदरे
नगदेनु माडुवनु कवि ?
मूर्तिय रूवारि नानु तानेंदु
कल्लु उळि कादाडिदरे
नगदेनु माडुवनु शिल्पी ?
चित्रक्के कर्तृ नानु तानेंदु
वण्ण कुंच बडिदाडिदरे
नगदेनु माडुवनु चित्रकार ?
जगदागु होगु गळिगे कारण नानु तानेंदु
जड मतिगळु होडेदाडिदरे
नगदेनु माडुवनु स्वतंत्रधीर सिद्धेश्वर ?

काव्याचे कारण मी स्वतःच म्हणून
कागद शाई वादू लागले तर
हसण्याशिवाय काय करणार कवी ?
मूर्ती घडविणारा मी स्वतःच म्हणून
दगड छिन्नी करवादू लागले तर
हसण्याशिवाय काय करणार शिल्पी?
चित्राचा कर्ता मी स्वतःच म्हणून
रंग कुंचला भांडू लागले तर
हसण्याशिवाय काय करणार चित्रकार ?
जग होण्या जाण्याला कारण मी स्वतःच म्हणू
जडबुद्धीजन तंडू लागले तर
हसण्याशिवाय काय करणार स्वतंत्रधीर सिद्धेश्व

-( वचन क्र. १०४ )-

## - चौतीस -

आदिरिनल्लि चिन्न दोडने मण्णिदेयेंदु
अल्लगळेयबहुदे अदन्नु ?
हण्णिनल्लि रसदोडने गोरटु सिप्पेगळिवेयेंदु
बीळुगळेयबहुदे अदन्नु ?
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा, हलवु दोषगळिवेयेंदु
उपेक्षिसबहुदे नीनु नन्नन्नु ?

खनिजात सोन्यासह माती आहे म्हणून
तिरस्कारावे काय ते ?
फळात रंसासह बीज सालटे आहे म्हणून
फेकावे काय ते ?
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा, अनेक दोष आहेत म्हणून
उपेक्षावे काय तू मला !

( वचन क्र. १०७ )

## - पस्तीस -

'यावुदू स्थिरवल्ल !'
एंदु उसिर्गरेवुदु तरवल्ल;
स्थिर, अस्थिर,
एरडू हरन वर;
एरडरल्लू ओंदे स्वर; 'स्वतंत्रधीर सिद्धेश्वर !'

'काहीही स्थिर नाही.'
म्हणून उसासणे इष्ट नाही;
स्थिर, अस्थिर,
दोन्ही शिवाचे वर;
दोहोतही एकच स्वर; 'स्वतंत्रधीर सिद्धेश्वर'!

( वचन क्र. १८७ )

मगु मै मण्णु माडिकोंडिदेयेंदु
तादू तिरस्करिसुवळेनय्य ?
तोळेदु मुत्तिड्वळय्य !
शिष्य तप्पु बरेदनेंदु
गुरु तिरस्करिसुवनेनय्य ?
तिद्दि सरिपडिसुवनय्य !
ससि डोंकागि बेळेयितेंदु
तोटिग तिरस्करिसुवनेनय्य !
सेडे कट्टि ससिनगोळिसुवनय्य !
प्रयोग विफलवायितेंदु विज्ञानी
प्रयोग शालेयन्ने तिरस्करिसुवनेनय्य ?
होस प्रयोग हुडुवनय्य !
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा, नानु केट्टेनेंदु
नीनु सिट्टागबहुदेनय्य ?
तिद्दि उद्धरिसय्य !

मुलाने अंग मातीने माखले म्हणून
आई तिरस्कारते काय बा ?
धुवून चुंबन घेते ना !
शिष्यानें चुकीचे लिहिले म्हणून
गुरु तिरस्कारतो काय बा ?
सुधारून बरोबर करतो ना !
रोप वाकडे वाढते म्हणून
माळी तिरस्कारतो काय बा ?
आधार देऊन सरळ वळवितो ना !
प्रयोग विफल झाला म्हणून शास्त्रज्ञ
प्रयोग शाळेलाच तिरस्कारतो काय बा ?
नवा प्रयोग शोधतो ना !
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा, मी वाईट म्हणून
तू रागवावेस काय बा ?
सुधारून उद्धरी ना !

–( वचन क्र. १०९ )–

## – सदतीस –

नीनु कायलेळसिदरे कोल्लुववरारय्य ?
नीनु कोल्ल बयसिदरे कायुववरारय्य ?
नीनु एत्ति हिडिदरे इळिसुववरारय्य ?
नीनु केळगोत्तिदरे मेलेत्तुववरारय्य ?
नीनु क्षमिसिदरे शिक्षिसुववरारय्य ?
नीनु शिक्षिसलेळसिदरे रक्षिसुववरारय्य ?
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा, रक्षिसु, इल्लवे शिक्षिसु–
कृपा कटाक्षदिंद वीक्षिसय्या !

तू तारणार असल्यास मारणार कोण बा ?
तू मारू इच्छिल्यास तारणार कोण बा ?
तू उचलून धरल्यास उतरविणार कोण बा ?
तू खाली दडपल्यास वर उचलणार कोण बा ?
तू क्षमा केल्यास शिक्षा करणार कोण बा ?
तू शिक्षा केल्यास रक्षिणार कोण बा ?
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा रक्षण कर वा शिक्षा कर
कृपा कटाक्षाने पाहा बा !

( वचन क्र. ११२ )

नानु नेय्द वलेयल्लि नाने सिलुकुवुदादरे
आ वलेय नेय्यदिरुवुदे मेलय्य !
नानु निर्मिसिद सिद्धांत-पंजरदल्लि
नाने बंधितनागुवुदादरे
आ पंजरव निर्मिसदिरुवुदे लेसय्य !
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
नन्न हम्मिन भक्ति-ज्ञान-वैराग्यगळु
नन्नन्ने कट्टि केडहुवुदादरे
इवुगळिगे ओळगागदिरुवुदे ओळितय्य !

मी विणलेल्या जाळयात मीच अडकणार असेन तर
ते जाळे न विणलेलेच बरे बा !
मी निर्मिलेल्या सिद्धांत-पंजरात मीच बंदिस्त
होणार असेन तर
तो पिंजरा न निर्मिलेलाच उत्तम बा !
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
माझ्या अहंतेने भक्ती-ज्ञान-वैराग्य
मलाच बांधून खाली पाडणार असतील तर
त्यांमध्ये न शिरलेलेच श्रेयस्कर बा !

–( वचन क्र. ११७ )–

# - एकोणचाळीस -

क्रीडेयिल्लद जीवन कीडे तिंद हण्णय्य ;
प्रीतिविल्लद जीवन नातविल्लद हूवय्य ;
गुरियिल्लद जीवन गरियिल्लद हक्कियय्य ;
शीलविल्लद जीवन शीर्णमूल तरुमरवय्य ;
स्नेहविल्लद जीवन स्नेहविल्लद सोडरय्य ;
विनोदविल्लद जीवन सुनादविल्लद सनाददियय्य
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा ;
निन्न मरेत जीवन नीरु बरत सरोवरवय्य !

क्रीडेविना जीवन कीड लागलेले फळ बा ;
प्रीतिविना जीवन सुवासाविना फूल बा ;
ध्येयाविना जीवन पंखाविना पक्षी बा ;
शीलविना जीवन जीर्णमूल तरुवृक्ष बा ;
स्नेहाविना जीवन स्नेहाविना दीप बा ;
विनोदाविना जीवन नादाविना सनई बा ;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा ;
तुला विसरलेले जीवन जलाविना शुष्क सरोवर बा!

– ( वचन क्र. ११८ ) –

# - चाळीस -

केरद खर्चु उळिसलु
कालुगळन्ने कत्तरिसिकोंडवरु उंटेनय्य ?
मंजनद वेच्च उळिसलु
हल्लुगळन्ने कित्तोगेदवरु उंटेनय्य ?
वैद्यर शुल्क उळिसलु
व्याधियन्ने अप्पिकोंडवरु उंटेनय्य ?
तिगणेय काट तप्पिसिकोळ्ळलु
मनेगे बेंकि हच्चिदवरु उंटेनय्य ?
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
नीनिल्लवेंदु साधिसलु
तानिल्लवेंदु वादिसुववरु उंटेनय्य ?

वहाणांचा खर्च वाचविण्यासाठी
पाय छाटून टाकणारे आहेत काय बा ?
मंजनाचा खर्च वाचविण्यासाठी
दात उपटून टाकणारे आहेत काय बा ?
वैद्याची बिदागी वाचविण्यासाठी
व्याधींना कवटाळणारे आहेत काय बा ?
ढेकणांचा त्रास वाचविण्यासाठी
घराला आग लावणारे आहेत काय बा ?
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
तू नाहीस असे सिद्ध करण्यासाठी
आपण नाहीत म्हणून वाद घालणारेही
आहेत काय बा ?

– ( वचन क्र. १२१ ) –

## - एक्केचाळीस -

आरोग्य बेकु, आरोग्य सूत्रगळ पालने बेड;
संसार सुख बेकु, संसारद होणे बेड;
अधिकार बेकु, कर्तव्य निर्वहणे बेड;
जनद मतगळु बेकु, जनहित साधने बेड;
शासनद रक्षे बेकु, शासनद रक्षणे बेड;
विश्वविद्यालयद पदवि बेकु, अध्ययन बड;
धर्मनीडुव फल बेकु, धर्माचरणे बेड;
समाजवीव सुखगळु बेकु, समाजसेवे बेड;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
नीनु नीडुव दानगळु बेकु,
नीनु बेड निन्ननोल्लदवरिगे !

आरोग्य हवे, आरोग्याच्या नियमांचे पालन नको;
संसारसुख हवे, संसाराची जबाबदारी नको;
अधिकार हवा, कर्तव्यपालन नको;
लोकांची मते हवीत, लोकहित साधणे नको;
शासनाकडून संरक्षण हवे, शासनाचे रक्षण नको;
विश्वविद्यालयाची पदवी हवी, अध्ययन नको;
धर्मदत्त फल हवे, धर्माचरण नको;
समाजनिर्मित सुखं हवीत. समाजसेवा नको;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
तू दिलेली दाने हवीत,
तू नकोस, तू नकोसा असणाऱ्यांना !

–( वचन क्र. १२४ )–

## – बेचाळीस –

अज्ञ युग होय्तु,
यज्ञ युग होय्तु,
प्राज्ञ युग होय्तु,
धर्मयुग दानयुगगळू होदुवु !
मानवतायुगवू होगुत्तिरुवंतिदे –
कंप्यूटर–मानवर आविर्भावदोडने !
याव युग बरलिदियो मुंदे ? !
संदेह संदीहदल्लि सिक्कि
अक्कस वडुत्तिहेवय्य !
कायय्य, कायय्य,
विश्वासद ऊरुगोल नीडय्य –
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

अज्ञयुग गेले,
यज्ञयुग गेले,
प्राज्ञयुग गेले,
धर्मयुग दानयुगादीही गेली !
मानवतायुगही गेल्या सारखेच आहे –
कॉम्प्यूटर–मानवाने आविष्कारिले !
कोणते युग अवतरणार पुढे ? !
संदेह संभ्रमात सापडून
संत्रस्त होत आहोत बा !
वाचव, वाचव बा,
विश्वासाच्या काठीचा आधार देई बा –
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

–( वचन क्र. १३२ )–

## – त्रेचाळीस –

वृक्ष फलभरित वागिद्दरे
पक्षिगळिगाव कोरतेय्य ?
लतेयतुंब हूविद्दरे
दुंबगळिगाव बरवय्य ?
सक्करे सूरेयागिद्दरे
इरुवेगळिगाव अरकेयय्य ?
सिरि, अधिकार इद्दरे
होगळुववरिगाव अभाववय्य ?
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
उळ्ळवरिगे एल्लरू एल्लवू उंटु –
इल्लदवरिगे मात्र नीनोब्बने अय्य !
इल्लदवर कै बिडिदिरय्य.

वृक्ष फळांनी लखडले तर
पक्ष्यांना कसली कमतरता ?
वेली फुलांनी बहरल्या तर
मधुमक्षिकांना कसला दुष्काळ ?
साखर सांडली असेल तर
मुंग्यांना कसली वाण ?
संपत्ती, सत्ता असल्यावर
स्तुतिपाठकांचा कसला अभाव ?
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
असणाऱ्यांना सर्वजण, सर्वकाही आहे –
नसणाऱ्यांना मात्र तूच एक बा !
नसणाऱ्यांचा हात सोडू नकोस बा.

–( वचन क्र. १३४ )–

## -चव्वेचाळीस-

नन्न तंतिगळ हरिदवनू नीने,
ननगे हरिद तंतिय
तंबूरियिन्नुववनू नीने !
होस तंतिगळ हाकबल्ले नीनु,
होस हाडुगळ हाडबल्ले नानु,
एके हाकलोल्लेयय्या ?
सस्वनगान केळीयायतु,
निःस्वनगान केळलासेयेन्नुविय्या ?
हाडुतल्ले इरुवे केळद हाडन्नु
केळिसदेनय्या,
केळिसदेकय्या—
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

माझ्या तारा तोडणारा तूच,
मला तुटलेल्या तारांचा
तंबोरा म्हणणाराही तूच !
नव्या तारा जोडू शकणारा तू,
नवी गीतं गाऊ शकणारा मी,
का मग जोडीत नाहीस बा ?
सस्वन गान ऐकून झाले,
निःस्वन गान ऐकावेसे वाटे काय बा?
मी तर गातच राहिलो ऐकू न येणारे गीत
ऐकत नाहीस का,
का ऐकत नाहीस वा—
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

—( वचन क्र. १४२ )—

## – पंचेचाळीस –

अवरिवरु प्रीतरागलेंदु
अदनिदनु नुडिदायितु,
एंतेंतो नडिदायितु !
माडिव मुन्न ओम्मे,
ओम्मेये ओम्मे
नीनु प्रीतनागुव हागे नुडिसय्य,
नीनु मेच्चुव हागे नडिसय्य–
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

अमक्यातमक्यांनी प्रेम करावे म्हणून
अमुकतमुक सांगून झाले
कसे कसे वागून झाले !
मरण्यापूर्वी एकदा,
अगदी एकदाच
तू प्रेम करावेस असे सांग बा ;
तुला आवडावे असे वागव बा–
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

–( वचन क्र. १५२ )–

## - शेहेचाळीस -

एनगारू इल्लवेंदाग
यारिंदलो नेरवु नीडिसिदे;
एनगेनू इल्लवेंदाग
यल्लिंदलो सहाय ओदगिसिदे;
एनगेनू तोचदेंदाग
एनगरियदंतेंये दारि तोरिसिदे;
‘ इन्नेंतो ’ एंदाग
एंतेंतो पारुगाणिसिदे !
अंतेये, ‘ सर्ववू एन्निंग ’ एंदाग
गर्वहरण माडि
‘ ओर्वने स्वतंत्रधीर सिद्धेश्वर, ’
एंब पाठ कलिसय्य !

मला कोणीही नसल्यावर
कोणाकडून तरी सहाय्य देवविलेस;
मला काहीही नसल्यावर
कोठून तरी सहाय्य पोचविलेस;
मला काही सुचेनासे झाल्यावर
माहीत नसलेला मार्ग दखविलास
‘ आता पुढे कसे ’ म्हटल्यावर
कसे कसे पार पाडलेस !
तसेच ‘ सर्व काही माझ्यामुळे ’ म्हटल्यावर
गर्वहरण करून
‘ खरा एक स्वतंत्रधीर सिद्धेश्वर ’
असा धडा :देई बा !

–( वचन क्र. १५३ )–

एनगारू इल्लवेंदाग
यारिंदलो नेरवु नीडिसिदे;
एनगेनू इल्लवेंदाग
यल्लिंदलो सहाय ओदगिसिदे;
एनगेनू तोचदेंदाग
एनगरियदंतेये दारि तोरिसिदे;
' इन्नेंतो ' एंदाग
एंतेंतो पारुगाणिसिदे !
अंतेये, ' सर्ववू एन्निंग ' एंदाग
गर्वहरण माडि
' ओर्वने स्वतंत्रधीर सिद्धेश्वर, '
एंब पाठ कलिसय्य !

मला कोणीही नसल्यावर
कोणाकडून तरी सहाय्य देवविलेस;
मला काहीही नसल्यावर
कोठून तरी सहाय्य पोचविलेस;
मला काही सुचेनासे झाल्यावर
माहीत नसलेला मार्ग दखविलास
' आता पुढे कसे ' म्हटल्यावर
कसे कसे पार पाडलेस !
तसेच ' सर्व काही माझ्यामुळे ' म्हटल्यावर
गर्वहरण करून
' खरा एक स्वतंत्रधीर सिद्धेश्वर '
असा धडा :देई बा !

–( वचन क्र. १५३ )–

# – अठ्ठेचाळीस –

वाळ बंडिगे बुद्धि भावगळेरडु गालिगळु,
शीलवे कोलवय्य;
वाळ हक्किगे अर्थ कामगळेरडु रेक्केगळु,
धर्मवे धारणशक्तियय्य;
बाळ हणतेगे रीतिनीतिगळे एण्णेबत्तिगळु,
प्रीतिये ज्योतियय्य;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
बाळ हण्णिनल्लि शक्तिरक्तिगळे बीज सिप्पेगळु
भक्तिये मधुर रसवय्य !

जीवनाच्या गाड्याला बुद्धीभावनेची दोन चा
शीलच आस बा;
जीवन पक्ष्याला अर्थकामाचे दोन पंख,
धर्मच धारणाशक्ती बा;
जीवन दीपाला रीतिनीतीची तेलवात,
प्रीतीच ज्योती बा;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
जीवन फळात शक्तीरक्तीचे बीज कवच,
भक्तीच मधुर रस बा !

– ( वचन क्र. १६७ ) –

## - एकोणपन्नास -

नविलुतीर्थद हेरोडलु तुंबितु;
पंपाक्षेत्रद पेर्मडिलु तुंबितु;
भाख्रा-नंगालिन मरिकडलु तुंबितु;
ई बाळ किरिगोडमात्र, बरिदागिये उळियितय्य!
आगाग अर्ध तुंबि तुळुकि तल्लणगोळिसितय्य!
बरिगोडव ताळिकोळ्ळबहुदु,
अरेगोडव ताळलागदय्य !
पूर्ण तुंबिसु,
इल्लवे बरिदागि उळिसु
निन्निष्टदंते !
आदरे, कोड मात्र निन्नदेंदेनिसय्य,
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

नविलु तीर्थाचे लंबोदर भरले;
पंपाक्षेत्राची विशाल कूस भरली;
भाक्रा-नांगलचा बालसमुद्र भरला;
हे अल्पपात्र मात्र रिते राहू दिलेस बा !
कधीमधी अर्धे भरून डुचमळण्याने त्रास होतो ना!
रिते पात्र परवडले
अर्धे पात्र असह्य होय बा !
पूर्ण भरू दे
नसता रिते राहू दे
तुला इष्ट वाटल्यास!
परंतु, पात्र मात्र तुझेच समज बा;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

-( वचन क्र. १७१ )-

## - पन्नास -

ಹಸಿ ಬಿಸಿಯ ಗಣಿಸುವುದೆ ಹಸಿವೆ ?
ಸ್ವಾದು ಸವುಳ ನೆಣಿಸುವುದೆ ತೃಷ್ಣೆ ?
ಹಾಸಿಗೆಗೋಸಿಗೆಯ ಕಾಯುವುದೆ ಕಾಮ ?
ಕಾಲಾಕಾಲವ ಲೆಕ್ಕಿಸುವುದೆ ಕ್ರೋಧ ?
ಅನ್ಯರ ತನ್ನವರ ಗಮನಿಸುವುದೆ ಲೋಭ ?
ಮಾನಾಪಮಾನಗಳ ಲಕ್ಷಿಸುವುದೆ ಮೋಹ ?
ಮನೆ ಮಠಗಳ ಮನ್ನಿಸುವುದೆ ಮದ ?
ಲಿಂಗ ವಯಗಳ ಈಕ್ಷಿಸುವುದೆ ಮತ್ಸರ ?
ಇತಿಮಿತಿಗಳ ಅವಲೋಕಿಸುವುದೆ ಅತ್ಯಾಸೆ ?
ಉಚಿತಾನುಚಿತವ ವಿವೇಚಿಸುವುದೆ ಜಿಪುಣತನ ?
ಸ್ವತಂತ್ರಧೀರ ಸಿದ್ಧೇಶ್ವರಾ,
ನಿನ್ನ, ನಿನ್ನವರನೊಲಿವುದೆ ಪತಿತಮನ ?

शिळ्यापाक्याचा विचार करतें का भूक?
गोड मचुळ आठविते का तृष्णा ?
शेजशय्यची वाट पाहातो का काम ?
काळवेळेचा हिशेब करतो का क्रोध ?
आपल्या परक्याला जुमानतो का लोभ ?
मानापमान लक्षात घेतो का मोह ?
घर मठमंदिरे मानतो का मद ?
लिंग वयादी पाहातो का मत्सर ?
इतिमिती पाहाते का अत्याशा ?
उचितानुचिताचा विवेक करते का हाव?
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
तू व तुझे म्हणविऱ्यावर प्रेम करते का पतित मन?

- ( वचन क्र. १७६ ) -

## -एक्कावन्न-

निन्न बरविन मुन्नेच्चरिकेयनीव
राडर आगलिय्य नन्न हृदय;
निन्न अडिय अयस्कांतक्के अंटिकोळ्ळुव
लोहचूर्णवागलिय्य नन्न जीर्णशीर्ण मन;
नन्न संकल्पद संकेतव सुत्तु सुत्तुव
क्षिपणियागलय्य नन्न तनु;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
निन्न प्रयोगशालेयल्लोंदु
टेस्ट टच्यूब आगलय्य नन्न जीवन !

तुझ्या आगमनाची पूर्व सूचना देणारे
रडार होऊ दे बा मम हृदय;
तुझ्या चरणचुंबकाला चिकटणारे
लोहचूर्ण होऊ दे बा मम जीर्णशीर्ण मन;
तुझ्या संकल्पसंकेताभवती घिरटया घालणारे
क्षेपणास्त्र होऊ दे बा माझी तनु,
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
तुझ्या प्रयोगशाळेतील एक
टेस्ट टच्यूब होऊ दे बा मम जीवन !

-( वचन क्र. १८१ )-

## -बावन्न-

‘ नन्न निन्न नडुवे अदेष्टु अंतर !’
एदु उद्गरसुविय्या ?
नन्न नन्न तनद नडुविन अंतर
इदक्कू हिरिदु !
नन्न नन्न तनद नडुवण अंतर होदरे
नन्न, निन्न नडुवण अंतरवू अळिवुदय्य–
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

‘ माझ्या तुझ्यामध्ये किती अंतर !’
असे उद्गारावे काय बा ?
माझ्या माझ्यामधील अंतर
याहूनही मोठे !
माझ्या माझ्यातील अंतर संपले तर
माझ्या, तुझ्यातील अंतरही मिटेल बा–
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

–( वचन क्र. १८३ )–

## -त्रपन्न-

फलवित्त रेंबे बागुत्तदे,
गोने होत्त बाळे बागुत्तदे,
तेने हेत्त दंटु बागुत्तदे,
एनेनो इल्लदुदु बीगुत्तदे नोडा–
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

फळयुक्त डहाळी वाकते,
घडाच्या भाराने केळ वाकते,
कणीस धरलेले धाट वाकते,
काहीही नसलेले ताठ राहाते पाहा–
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

–( वचन क्र. १८५ )–

## - चौपन्न -

ಹಣ कोळ्ळलागदुदू इदेयय्य
निन्न सृष्टियल्लि;
यंत्र माडलरियदुदू इदेयय्य
निन्न लोकदल्लि;
ज्ञान-विज्ञान तिळियलागदुदू इदेयय्य
निन्न विश्वदल्लि;
समृद्धि नीडलादुदू इदेयय्य
निन्न जगत्तिनल्लि;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
मरण गेललागदुदू इदेयय्य
निन्न प्रपंचदल्लि !

धनाने विकत घेता न येणारे आहे बा
तुझ्या सृष्टीत;
यंत्राने करता न येणारे आहे बा
तुझ्या लोकात;
ज्ञान-विज्ञानाला न समजणारे आहे बा
तुझ्या विश्वात;
समृद्धीने न मिळणारे आहे बा
तुझ्या जगतात;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
मरणाला जिंकता न येणारे आहे बा
तुझ्या प्रपंचात !

-( वचन क्र. १९३ )-

एग्ग उरुलु हाकिकोंडनेंदु
हग्गवके शिक्षे विधिसुवुदे ?
शलभ सुट्टुकोंडु सत्तितेंदु
दीपवके दंड हाकुवुदे ?
उंड्डु अजीर्णवायितेंदु
वाणसियन्नु बंधिसुवुदे ?
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
निन्न हेसरिनल्लिये
नडियबारदुदेल्ल नडिवदेंदु
निनगे बहिष्कार हाकुवुदे ?

मूर्खाने गळफास घालून घेतला म्हणून
दोराला शिक्षा सांगावी काय ?
पतंग जळून मेला म्हणून
दिव्याला दंड करावा काय ?
जेवणाचे अजीर्ण झाले म्हणून
स्वयंपाक्याला बंदीत टाकावे काय ?
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
तुझ्या नावाखाली
होऊ नये ते सर्व होत आहे म्हणून
तुझ्यावरच बहिष्कार घालावा काय ?

-( वचन क्र. २०४ )-

## - छप्पन्न -

हसुविगे हत्तियकाळु तिन्निसुवुदु
हेच्चु हालु कोडलेंदल्लदे
हसुविन मेलण मरुकदिंदल्लवय्य;
हण्णिन तोटक्के बेलियिक्कुवुदु
हण्णु उळियलेंदल्लदे
मरगळ मेलण ममतेयिंदल्लवय्य;
मानवरेल्ल माडुवुदु
कोनेय विश्लेषणेयल्लि
बहुतेक तमगागियय्य;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
ना निन्न नेनेयुदु
निनगागियल्ल, ननगागियय्य !

गायीला सरकी खाऊ घालायची
अधिक दूध द्यावे म्हणून ना
गायीवरील मायेमुळे नव्हे बा;
फळझाडांच्या मळ्याला कुंपण घालायचे
फळे राखावी म्हणून ना
वृक्षावरील ममतेमुळे नव्हे बा;
मानव सर्व करतात ते
शेवटी विश्लेषणांती
बहुतेक स्वत:साठीच बा;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
मी तुला आठवायचे
तुझ्यासाठी नव्हे, माझ्यासाठी बा!

-( वचन क्र. २०७ )-

## - सत्तावन्न -

गरि ननगे होरेयेंदरे
हार बहुदे हक्कि ?
कत्तले ननगे कहियेंदरे
मूडबल्लुदे चिक्कि ?
केश ननगे भारवेंदरे
हेणेयबहुदे हेळल ?
ऊदुवुदु ननगे तलेनोवेंदरे
नुडिसबहुदे कोळल ?
अगियुवुदु ननगे आगदेंदरे
तिन्नबहुदे रोट्टिय ?
अरलु ननगे सेरदेंदरे
माडबहुदे मिट्टिय ?
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !
साधने ननगे नीगदेंदरे,
पडेय बहुदे सिद्धिय ?

पंखाचे मला ओझे होते म्हणेल तर
उडू शकेल का पक्षी ?
अंधार मला अप्रिय म्हणेल तर
उगवू शकेल का नक्षत्र नक्षी ?
केसांचा मला भार म्हटले तर
घालता येईल का वेणी ?
वाजवणें मला डोकेदुखी म्हणेल तर
वाजू शकेल का वेणू ?
चावणे मला होत नाही म्हटले तर
खाता येईल का भाकरी ?
गारा मला आवडत नाही म्हटले तर
करता येईल का ढिगारा ?
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
साधना मला साधत नाही म्हटले तर
मिळविता येईल का सिद्धी ?

-( वचन क्र २१४ )-

## – अट्ठावन्न –

नाटकद सीतेये निजवाद सीतेयेंदु
भ्रमिसिदंते आयित्तय्य एन्नबाळु !
तेरेय मेल्लिन तवसिये विरतिय ओरते येंदु
भ्रमिसिदंते आयित्तय्य एन्न बदुकु !
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
नेरळे वस्तु, कनसे ननसु,
हग्गवे हावु, माते कृति,
होळेदद्दे चिन्न, मिंचिद्दे रन्न,
वेळ्ळगिद्दुदे हालु, बयकेये पूरैकेयेंदु
भ्रमिसिदंते आयित्तय्य एन्न इरवु !

नाटकातील सीताच खरी सीता समजून
फसल्यासारखे झाले वा मम जीवन !
पडद्यावरील तपस्वीच वैराग्याचे आगर समजून
फसल्यासारखे झाले वा माझे आयुष्य!
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
छायाच वस्तू, स्वप्नच वास्तव
रज्जूच सर्प, उक्तीच कृती
चकाकणारेच सोने, चमकणारेच रत्न
पांढरे असलेलेच दूध, इच्छाच पूर्ती समजून
फसल्यासारखे झाले वा मम अस्तित्व !

–( वचन क्र. २१७ )–

# - एकोणसाठ -

ವ್ಯಾಸಂಗಕ್ಕೆ

व्यासंगक्के समयविल्ल, सत्संगक्के समयविल्ल,
नाडु, नुडि, नाडिगर सेवेगे समयविल्ल !
इन्नुळिदुदक्के एंतादरू समय सिक्कुवुदय्य !
जूजिगे, जिद्दिगे, चाडिगे, केडिगे, निंदेगे, सिंदिगे—
एल्ल दुर्व्यसन दुर्व्यापारगळिगू समयविदे
निन्न मक्कळिगे आगि, ओळितिगे बागि
सत्कर्मदल्लि मागि
निन्नेडेगे सागलु समयविल्लवय्य—
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

व्यासंगासाठी वेळ नाही, सत्संगासाठी सवड नाही,
देश, भाषा, समाजाच्या सेवेसाठी सवड नाही!
उरलेल्यासाठी कशीही सवड सापडते बा !
रेससाठी, स्पर्धेसाठी, चहाडी-निंदेसाठी, मद्यासाठी,
सर्व दुर्व्यसन दुष्कृत्यासाठी सवड आहे,
तुझ्या मुलांसाठी होऊन, भल्यासाठी लवून,
सत्कर्मरत राहून
तुझ्या चरणाजवळ येण्यासाठी सवड नाही बा -
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

—( वचन क्र. २१९ )—

# - साठ -

चंदनद अंदणदल्लि हेंडद हरवियनिट्टु
मेरिसिदंतायित्तय्य एन्नबाळु !
बेळ्ळिय बट्टलदल्लि उळ्ळिय रस तुंबि
कुडिदंतायित्तय्य, एन्न वदुकु !
निर्जन विपिनमध्यदल्लिय दीप
उरिसिदंतायित्तय्य एन्न इरवु !
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
शवक्के माडिद शृंगारवादंतायित्तय्य नन्न जीवन!

चंदनाच्या पालखीत दारूचा बुधला ठेवून
मिरविल्यासारखे झाले बा मम जीवित !
चांदीच्या बाटीत कांद्याचा रस भरून
पिल्यासारखे झाले बा माझे आयुष्य !
निर्जन अरण्याच्या मध्यावर चंदन तेलाचा दीप
जाळल्यासारखे झाले बा माझे अस्तित्व
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
शवाला केलेल्या शृंगारासारखे झाले बा ममजीवन!

–( वचन क्र. २२८ )–

# - एकसष्ट -

इदुवरेगिन बाळु हाळायितेंदु हळहळिसुत्त
इन्नुळिद बाळन्नू हाळुमाडिकोळ्ळेनय्या !
इदुवरेगिन हारैकेगळु पूरैकेगळागलिल्लवेंदु
मुंदे हारैसुवुदन्ने तोरेदु बिडेनय्या !
हाळाद बाळिन हाळु मण्णिनल्लिये
हण्णादग हारैकेगळ गोरटेगळन्नूरि
कृतकृत्यतेय कैतोटवन्नु बेळेसुवेनय्य-
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

आजवरचे जीवित वाया गेले म्हणून हळहळत
उरलेलें जीवितही वाया जाऊ देणार नाहीं बा!
आजवरच्या इच्छा पूर्ण झाल्या नाहीत म्हणून
पुढे इच्छिण्याचेच सोडून देणार नाही बा !
वाया गेलेल्या जीविताच्या जुन्या खतमातीतच
अपूर्ण इच्छांच्या बिया पेरून
कृतकृत्यतेचा बगीचा फुलवीन बा-
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

-( वचन क्र. २२९ )-

# – बासष्ट –

तुक्कु हिडिदु उळिवुदक्किंत
तिविक बळसि अळिवुदु मेलय्य;
हुळु हत्ति कोळेवुदक्किंत
मण्ण बेरेतु मोळेवुदु मेलय्य;
इट्टु, नुसि मुट्टि नशिसुवुदक्किंत
तोट्टु उट्टु हरियुवुदु मेलय्य;
उंडु मलगि बोज्जु बेळेसुवुदक्किंत
माडि माडि मडिवुदु मेलय्य;
ओदि, बोधिसि, वादिसुवुदक्किंत
अरितु, आचरिसि, आदर्शवागुवुदु मेलय्य;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
मणियनेणिसि दणियुदक्किंत
जनर तणिसि कुणिवुदु मेलय्य !

गंज लागून जगल्यापेक्षा
घासून वापरून संपलेले बरे बा;
कीड लागून सडल्यापेक्षा
मातीत मिसळून अंकुरणे बरे बा;
ठेवून चाय लागून नष्ट झाल्यापेक्षा
नेसून वापरून फाडलेले बरे बा;
जेवून झोपून दोंद वाढविण्यापेक्षा
करून करून मरणे बरे बा;
पठण करून, उपदेशून वाद घालण्यापेक्षा
समजून, आचरून आदर्श होणें बरे बा;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
जपमाळ ओढून श्रमल्यापेक्षा
जन तोषवून तृप्त होणे बरे बा !

–( वचन क्र. २३३ )–

## -त्रेसष्ट-

ओळ्ळेय जीवनक्किता ओळ्ळेय तत्त्ववनरियेनय्य;
ओळ्ळेय नडतेगित ओळ्ळेय मतवनरियेनय्य;
ओळ्ळेय नुडिगित ओळ्ळेय हितवनरियेनय्य;
सत्यदिंद बेरे शिवव, शिवदिंद बेरे सुंदरव,
सुंदरवनुळिद आनंदवनरियेनय्या;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा, निन्ननुळिद निजव;
निजकु मिगिलाद धर्मव, नानरियेनय्या !

चांगल्या जीवनापेक्षा चांगले तत्त्व माहीत नाहीबा;
चांगल्या वागण्यापेक्षा चांगले मत माहीत नाहीबा;
चांगल्या बोलण्यापेक्षा चांगले हित माहीत नाहीबा;
सत्याहून वेगळे शिव, शिवाहून वेगळे सुंदर,
सुंदराला सोडून आनंद माहीत नाही बा;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा, तुला सोडून खरोखर,
तुझ्याहून श्रेष्ठ धर्म, मला माहीत नाही बा !

-( वचन क्र. २३६ )-

## -चौसष्ट-

कत्तलेयन्नु कडेदरे
बेळकिन बेण्णे बरबहुदे ? बारदय्या !
तामसवन्नु तळिसिदरे
तिळिविन तंडुल बरुवुदे ? बारदय्या !
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
निन्नोलुमेय गळिसदेगैद साधनेगे
सिद्धिश्री दोरेयबहुदे ? दोरेयदय्या !

अंधाराचे मंथन केल्याने
प्रकाशाचे लोणी निघेल ? निघणार नाही बा !
तामसाला सडल्याने
ज्ञानाचा तांदूळ निघेल ? निघणार नाही बा !
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
तुझी प्रीती मिळविल्याविना केलेल्या साधनेला
सिद्धिश्री लाभेल ? लाभणार नाही बा !

-( वचन क्र. ४४४ )-

एनु पडेदेवेंबुदु मुख्यवल्ल,
हेगे दुडिदेवेंबुदु मुख्यवय्य;
एन नुडिदेवेंबुदु मुख्यवल्ल,
हेगे नडेदेवेंबुदु मुख्यवय्य;
एनु गळिसिदेवेंबुदु मुख्यवल्ल,
हेग वळसिदेवेंबुदु मुख्यवय्य;
एन केळिदेवु, हेळिदेवेंबुदु मुख्यवल्ल,
हेगे बाळिदेवेंबुदु मुख्यवय्य;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
एन गेद्देवेंबुदु मुख्यवल्ल,
एनागिद्देवेंबुदु मुख्यवय्य !

काय मिळाले ते मुख्य नाही,
कसे मिळविले ते मुख्य बा;
काय बोललो ते मुख्य नाही,
कसे वागलो ते मुख्य बा;
काय कमावले ते मुख्य नाही,
कसे उपयोजिले ते मुख्य बा;
काय ऐकिले, सांगितले ते मुख्य नाही,
कसे जगलो ते मुख्य बा;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
काय जिंकले ते मुख्य नाही,
काय झालो ते मुख्य बा !

-( वचन क्र. २३८ )-

हाजरि हाकुत्तले ओडिहोगुव बालकनंते नलवु,
हाजरिद्दु कलियुव बालकनंते नोवु –
जीवनद पाठशालेयल्लि;
नोविन तेरेय मोगदल्लि नगेय नोरें
बाळिन होनलिनल्लि;
नोविन हाविगे नलविन परे
वदुकिन हुत्तदल्लि;
नोविन बट्टलिनल्लि नलविन मदिरें
जीवनद मेजवानियल्लि !
नाण्यद ओंदु मुख बेकु,
इन्नोंदु बेडवेंदरे हेगय्य ?
नोवु-नलविन नेंळलु बेळकिनाटदल्लिये
नेम्मदि पडेद परि कलिसय्य –
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

हाजरी लावताच पळून जाणाऱ्या बालकाचा आनं
हजर राहून शिकणाऱ्या बालकाची व्यथा –
जीवनाच्या पाठशाळेत;
दुःखतरंगाच्या मुखावर हास्याचा फेस
जीवनाच्या प्रवाहात;
दुःखाच्या सर्पाला सुखाची कात
जीवनाच्या वारुळात;
दुःखाच्या वाटीत सुखाची मदिरा
जीवनाच्या मेजवानीत !
नाण्याची एकच बाजू हवी,
दुसरी नको म्हणावे कसे वा ?
दुःख-सुखाच्या ऊन सावलीच्या खेळात
शांती मिळविण्याची रीत शिकव वा–
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

–( वचन क्र. २५१ )–

## - सदुसष्ट -

वा दुःखवे, नन्न सुखवागु नीनु;
वा निराशेये, नन्न आशेयागु नीनु,
वा हानिये, नन्न लाभवागु नीनु,
वा अकीर्तिये, नन्न कीर्तियागु नीनु,
वा तेगळिकेये, नन्न होगळिकेयागु नीनु !
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरन नंबिद ननगे
बेकावुदु, बेडवावुदु ?
इष्टवावुदु, अनिष्टवावुदु ?

ये दुःखा, माझे सुख होई तू;
ये निराशे, माझी आशा होई तू;
ये हानी, माझा लाभ होई तू;
ये अपकीर्ती, माझी कीर्ती होई तू!
ये टीके, माझी स्तुती होई तू;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरावर हवाला माझा,
हवे कोणते, नको कोणते ?
इष्ट कोणते, अनिष्ट कोणते ?

-( वचन क्र. २५४ )-

## - अडुसष्ट -

नाण्यविल्लदे मान्यरादवरिरबहुदु,
रुपिल्लदे गण्यरादवरिरबहुदु;
धर्मविल्लदे धन्यरादवरिरबहुदु;
गुणविल्लदे घनतेय पडेदवरिद्दरे तोरा
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

धन नसताही मान मिळालेले असू शकतील,
सौंदर्य नसताही गण्य झालेले असू शकतील;
धर्म नसताही धन्यता पावलेले असू शकतील;
गुण नसताही श्रेष्ठता मिळविलेले असतील तर दाखव—
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

-( वचन क्र. २५७ )-

मातुमातिगे निन्न हेसर बळसिकोळ्ळुवेनय्या
नन्न लाभक्कागि;
मातुमातिगे बडवर हेसर बळसिकोळ्ळुवेनय्या
नन्न स्वार्थक्कागि;
मातुमातिगे शास्त्र समाजगळ मातु एतुवेनय्या
नन्न सुखक्कागि;
मातुमातिगे देशधर्मगळ दुरुपयोगिसिकोळ्ळुवेनय्या
नन्न हितक्कागि;
नन्न दुरुपयोगक्के ओळगागद
विषय, वस्तु, व्यक्तियिद्दरे तोरा,
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा!

घडोघडी तुझ्या नावाचा उपयोग करावा का बा
माझ्या लाभासाठी;
घडोघडी गरिबांच्या नावाचा उपयोग करावा का बा
माझ्या स्वार्थासाठी;
घडोघडी शास्त्र समाजादिकांना पुढे करावे का बा
माझ्या हितासाठी;
घडोघडी देशधर्मादिकांचा उपयोग करावा का बा
माझ्या हितासाठी;
मी दुरुपयोग न केलेले
विषय, वस्तु, व्यक्ती असल्यास दाखव,
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा!

-( वचन क्र. २६३ )-

## - सत्तर -

पार्थेनियम पाथेयवागबल्लुदेनय्या ?
आक्टोपस अतिथेयवागबल्लुदेनय्या ?
नीरोन नीति उपादेयवागबागबल्लुदेनय्या ?
पृथ्वीवल्लभरिगे प्रजाप्रभुत्व,
पुरोहितशाहिगे समता तत्त्व,
जीननिगे दान, हीनानिगे नक्षत्रगान,
दीननिगे तत्त्वज्ञान अनुप्रेयवेनिस बहुदेनय्या ?
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
निन्न कण्णिगे मण्णेरचुव उपाय
श्रेयवेनिसबल्लुदेनय्या ?

पार्थेनियम पाथेय होऊ शकेल काय वा ?
आक्टोपसचे आतिथ्य होऊ शकेल काय वा?
नीरोची नीती अनुकरणीय होऊ शकेल काय वा?
पृथ्वीवल्लभाला प्रभुत्व,
पुरोहितशाहीला समतातत्त्व,
कद्रूला दान, हीनश्रुताला गंधर्वगान
दीनाला तत्त्वज्ञान प्रिय वाटेल काय वा ?
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
तुझ्या डोळ्यात धूळ फेकण्याचा उपाय
श्रेयस्कर होऊ शकेल काय वा ?

-( वचन क्र. २६९ )-

## -एकाहत्तर-

विलायतिय एम्मेयादोडेनु,
अदु तिन्नवुदु हुल्लन्ने;
वाराणसिय बेक्कादरेनु,
अदुतिन्नवुदु इलियन्ने;
मंत्रिणिय तलेय हेनादरेनु,
अदु तिन्नवुदु हेडसन्ने;
श्वेतभवनद सोणगवादोडेनु,
अदु तिन्नवुदु अडगन्ने;
मानससरोवरद कप्पे यादरेनु,
अदु तिन्नवुदु हुळुवन्ने;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
बुद्ध बसव बापुजियर
देशदल्लि वासिसिदृरेनु
नानु मेच्चिरुवुदु नाइतनवन्ने !

विलायती म्हैस झाली तरी,
ती खाणार गवतच;
वाराणसीचे मांजर झाले तरी,
ते खाणार उंदीरच;
मंत्रिणीच्या डोक्यातील ऊ झाली तरी,
ती खाणार केसातील मळच;
श्वेतभवनातील श्वान झाले तरी,
ते खाणार मांसच;
मानससरोवरातील बेडुक झाला तरी,
तो खाणार कृमीकीटकच,
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
बुद्ध बसव बापुजींच्या
देशात वास्तव्य असले तरी
मला आवडायची श्वानवृत्तीच !

-( वचन क्र. २७१ )-

## - बहात्तर -

नन्न नुडि नण्णिगे मीसलागलि,
नन्न नडे लेसिगॆ मीसलागलि,
नन्न निष्ठे कर्तव्यक्के मीसलागलि,
नन्न नल्मे सकल जीविगळिगे मीसलागलि,
नन्न तनु नाडुनुडिगळ ऊळिगक्के मीसलागलि,
नन्न धन निन्नवर दासोहक्के मीसलागलि,
नन्न मन जीवन निनगे मीसलागलय्या–।
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

माझी वाणी सत्यासाठी राखून ठेव,
माझी करणी भल्यासाठी राखून ठेव,
माझी निष्ठा कर्तव्यासाठी राखून ठेव,
माझी प्रीती सर्व जीवमात्रासाठी राखून ठेव,
माझी तनु देषभाषिकांच्या सेवेसाठी राखून ठेव,
माझे धन तव भक्तांच्या निर्वाहासाठी राखून ठेव,
माझे मन जीवन तुझ्यासाठी राखून ठेव बा–
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

–(वचन क्र. २८७)–

# - त्र्याहत्तर -

बयसुवुदु जीवगुण,
वयसदिरुवुदु देवगुणवेनय्या ?
बयसने देव, उत्पत्ति स्थिति लयगळन्नु ?
बयसने लोककल्याणवन्नु ?
बयसने सद्भक्तगानवन्नु ?
तनगागि बयसिदरे जीवगुण,
एल्लरिगागि बयसिदरे देवगुणवेंबेनय्या –
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

इच्छिणे जीवगुण,
न इच्छिणे देवगुण काय बा ?
इच्छीत नाही देव, उत्पत्ती स्थिती लयास्तव ?
इच्छीत नाही लोककल्याणास्तव ?
इच्छीत नाही सद्भक्तगानास्तव ?
स्वत:साठी इच्छिले तर जीवगुण,
सर्वांसाठी इच्छिले तर देवगुण म्हणावा बा –
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

–( वचन क्र २८९ )–

हू हेत्त बळ्ळिय
बाणंतितन माडुववरारय्य ?
फल तेत्त मरद
आभार मन्निसुववरारय्य ?
बेळकित्त दीपक्के
मानपत्र कोडुवरारय्य ?
तेने होत्त दंटिगे,
बिरुदबावलि कोडुवरारय्य ?
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
इंदिन नम्म नेम्मदिगे कारणराद
लक्ष लक्ष अज्ञात उपकारिगळ
उपकार स्मरिसुवरारय्या ?

फूल प्रसवणाऱ्या वेलीची
प्रसूती करणार कोण वा ?
फळ देणाऱ्या वृक्षांचे
आभार मानणार कोण वा ?
प्रकाश देणाऱ्या दिव्याला
मानपत्र देणार कोण वा ?
कणीस धरणाऱ्या धाटाला
बिरुदावली अर्पण करणार कोण वा ?
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
आज आमच्या शांतिसमाधानास कारण झालेल्या
लक्षावधी अज्ञात उपकारकर्त्यांचे
उपकार स्मरणार कोण वा ?

-( वचन क्र. २९४ )-

## - पंच्याहत्तर -

सरकार दरोडेकारनादाग
नौकररु नरभक्षकरागदिवरुवरेनय्या ?
सचिवरे सुलिगेगाररादाग
आप्त सहायकरु डकायितरागरेनय्या?
पोषकरे शोषकरादाग
आश्रितरु जीवनमृतरागरेनय्या ?
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
समाजवे समजवादाग
व्यक्ति पशुवादरे आश्चर्यवेनय्या ?

सरकारच दरोडेखोर झाले तर
नोकर नरभक्षक होणारच ना ?
मंत्रीच लुबाडणारे झाले तर
सचीव सहाय्यक डाकू होणारच ना ?
पोषकच शोषक झाले तर
आश्रित जीवनमृत होणारच ना ?
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
समाजच समजू शकला नाही तर
नराचा वानर झाला तर कोणते आश्चर्य ?

-( वचन क्र. ३३२ )-

वळितन्नु माडिदवरिगे वळितन्नु माडुवव मानव,
वळितन्नु माडदवरिगू वळितन्नु माडुवव महामानव,
केडुकन्नु माडिदवरिगू वळितन्नु माडुवव देवमानव
नोडय्या !
केडकन्नु माडिदवरिगे केडुकन्नु माडुवव नर,
केडुकन्नु माडदवरिगू केडुकन्नु माडुवव असुर,
वळितन्नु माडिदवरिगू केडुकन्नु माडुवव
निशाचर नोडय्या !
प्रीतिसिदवरन्नु प्रीतिसुवव मानव,
प्रीतिसदवरन्नू प्रीतिसुवव महामानव,
द्वेषिसुववरन्नू प्रीतिसुवव देवमानव नोडय्या !
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
नीनु सुखवित्ताग निन्नन्नु स्मरिसुवव नर,
नीनु सुखवित्तागलू स्मरिसदव असुर,
नीनु एल्ल इत्तगलू निंदिसुवव निशाचर नोडय्या!

भल्याचे भले करणारा तो मानव,
भले न करणाराचे भलें करणारा तो महामानव,
वाईट करणाराचेही भले करणारा तो
देवमानव जाण बा!
वाईटाचे वाईट करणारा तो नर,
वाईट न करणाराचे वाईट करणारा तो असुर,
भले करणाराचेही वाईट करणारा तो
निशाचर जाण बा!
प्रेम करणारावर प्रेम करणारा तो मानव,
प्रेम न करणारावर प्रेम करणारा तो महामानव,
द्वेष करणारावरही प्रेम करणारा तो देवमानव जाण बा !
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
तू सुख दिले असता तुला स्मरणारा तो नर,
तू सुख दिले असूनही तुला न स्मरणारा तो असुर,
तू सर्व दिले असूनही तुझी निंदा करणारा तो निशाचर जाण बा!

( वचन क्र. ३६४ )

मनेय सिरिवंतिके नागरिकतेय प्रतीक.
मनद सिरिवंतिके संस्कृतिय संकेतवय्या.
नडिगे नागरिकते, नृत्य संस्कृति
मातु नागरिकते. गीते संस्कृति
वण्ण नागरिकते, चित्र संस्कृति
शिलें नागरिकते, शिल्प संस्कृति
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
कर्म नागरिकते, कायक संस्कृतियय्या!

घरची श्रीमंती हे नागरिकतेचे प्रतीक,
मनाची श्रीमंती हा संस्कृतीचा संकेत.
चालणे नागरिकता, नृत्य संस्कृती
बोलणे नागरिकता, गीत संस्कृती
रंग नागरिकता, चित्र संस्कृती
शिला नागरिकता, शिल्प संस्कृती
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
कर्म नागरिकता, श्रम संस्कृती वा!

( वचन क्र. ३९० )

# -अठ्ठयाहत्तर-

अंगुलिमालानल्लि मृतवागिरदिद्द मानवते
भंगिगळल्लि इंगि होगिरदय्या ;
दशशिरनल्लि नशिसिहोगद संयमन
जनर प्रतिनिधीगळल्लि लुप्तवागबारदय्या;
दुर्योधननल्लि नष्ट वागदिद्द भ्रातृप्रेम
हेगलु मनेयवरल्लि मुगिदिरदय्या;
चंगीजनल्लि बत्तिरद पुत्रवात्सल्य
हिप्पिगळल्लि बेरतु होगिरलारदय्या;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
अर्थकामगळे परमार्थवेन्नुववल्लि
इल्लवागद जनकल्याणेच्छे
निन्नभक्तरल्लि इल्लवागबारदय्या !

अंगुलिमालाच्या ठायी न मेलेली मानवता
भंग्याच्या ठिकाणी लुप्त होऊ नये बा;
रावणाजवळचे अविनाशी संयमन
लोकप्रतिनिधीमधून नष्ट होऊ नये बा;
दुर्योधनाजवळचे अनष्ट भ्रातृप्रेम
शेजाऱ्याशी संपुष्टात येऊ नये बा;
चंगीझखानाचे अविरत पुत्रवात्सल्य
हिंप्पींच्या ठिकाणी विरळ होऊ नये बा;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
अर्थकामातच परमार्थ पाहाणाऱ्याजवळ
न दिसणारी जनकल्याणाची इच्छा
तुझ्या भक्तातूनही नाहीशी होऊ नये बा !

( वचन क्र. ३९५ )

## - एकोणऐंशी -

मने तुंब मुसुरेचेल्लि
नोण ओडिसलु ओडाडुदक्किंत
मने स्वच्छवागिरिसुवुदे मेलय्या;
अंगळतुंब केसरु केडहि
आसरगोलु हुडुकुवदक्किंत
केसरुबीळदन्ते सगुवुदे लेसय्या;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
समाज हदगेडुववरिगे सुम्मनिद्द आमेले
'क्रांति क्रांति' एन्दु किरिचुवुदेक्किंत
समाजवन्नु सदा सरिपडिसुत्तलिरुवुदे
श्रेयस्करवय्या !

घरभर खरकटे सांडून
माश्या उडविण्यासाठी धावण्यापेक्षा
घर स्वच्छ ठेवणे उचित बा;
अंगणभर चिखल करून
आधारासाठी काठी हुडकण्यापेक्षा
चिखल होऊ न देण्याची काळजी घेणे चांगले बा;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
समाज सडून जाईपर्यंत स्वस्थ राहून नंतर
'क्रांति क्रांति' म्हणून ओरडण्यापेक्षा
समाज सदा सुधारत राहाणे
श्रेयस्कर होय बा !

( वचन क्र. ३९८ )

नटनटियर दाम्पत्य–
अदोंदु आकस्मिक घटने, बरि नटने !
रसभाव, ध्वनि, ध्येयगळिल्लद साहित्य–
अदोंदु वृथायास, व्यर्थ रचने !
कसरकळेयदे हसिनोडदे एसगुव कृषिकृत्य
अदोंदु पाळगज्ज, निरर्थक श्रम !
अंत्येये, भक्तियिल्लद पूजे, निष्ठेयिल्लद ध्यान,
शांतियिल्लद मौन, शंके यळिसद ज्ञान,
चित्त तोळेयद स्नान, तृष्णे यळिसद पान,
श्रद्धेयिल्लद जप, शुद्धियिल्लद तप,
विश्वासविल्लद व्रत नियमादिगळु
काळिल्लद तेने, कारगळिल्लद गोने
अंदगंधगळिल्लद ननेगळय्या–
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

नटनटीचे दाम्पत्य–
ही एक आकस्मिक घटना, केवळ नाटक !
रस, भाव, ध्वनि, ध्येयाविना साहित्य
हा एक वृथा आयास, व्यर्थ रचना !
मशागतीविना,ओल पाहिल्याविना केलेले कृषिकर्म
ही एक नासाडी, निरर्थक श्रम !
तसेच भक्तिविना पूजा, निष्ठेविना ध्यान,
शांतिविना मौन, शंका निरसन न करणारे ज्ञान,
चित्ताला न धुणारे स्नान,तहान न भागविणारे पान
श्रद्धेविना जप, शुद्धिविना तप,
विश्वासाविना व्रत नियमादिक
दाण्याविना कणीस, फळाविना घड
सौंदर्यसुगंधाविना कळ्याच बा–
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

( वचन क्र. ३९९ )

# -एक्याऐंशी-

एसु काल कळेदरेनु,
एसुविनंथवरु एसुजन हुट्टबल्लरय्या ?
देशकालगळ सोसिदरे उळियुवरु
सासिरक्के मिगद मीसलु मानवरु !
उळिदवरु ?
चंद्रन उदयक्कागि आडुतियाद नक्षत्रगळु,
वसंतन आगमनक्कागि उदुरिद पांडुपत्रगळु,
मोनालिसाद मूडिकेगे मुन्न
बरेदु हरिद, मरेयाद करडु चित्रगळु,
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरन कंडुकोळ्ळुव मुन्न
पूजेगोंडु फरारियाद
तेत्तीसकोटि देवर्कळु !

कितीही काळ गेला तरी काय,
येशूसारखी माणसं किती जन्मतात ?
देशकालाच्या चाळणीतून वाचणारे
सहस्राच्या सुमार निवडक मानव !
उरलेले ?
चंद्रोदयाबरोबरच नष्ट होणारी नक्षत्रे,
वसंतागमनाबरोबरच गळणारी पिवळी पाने,
मोनालिसाच्या जन्माआधी
चितारून फाडलेली अदृश्य कच्ची रेखाटने,
स्वतंत्रधीर सिद्धेश्वराला पाहाण्यापूर्वी
पूजा स्वीकारून पळून गेलेले
तेहतीस कोटी देवदेवता !

-( वचन क्र. ४०० )-

कनसिन वैरियोडने
ननसिनल्लि कादुवुदेंतय्या ?
कल्पनेय केळदिय कैयन्नु
हंदरदल्लि हिडियुवुदेंतय्या ?
इल्लद कुदुरेय जूजन्नु
गेल्लव परि एन्तय्या ?
गगन कुसुमगळ भट्टियिळिसि
गंधदेण्णे तेगेयुवुदेंतय्या ?
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
मनुजत्ववन्नु मोदलु पडेयदे
देवत्ववन्नु पडेयुवुदेंतय्या ?

स्वप्नातल्या वैऱ्याशी
वास्तवात लढणार कसे बा ?
कल्पनेतल्या सखीचा हात
बोहल्यावर कसा धरणार बा ?
नसलेल्या घोडयांच्या शर्यतीत
जिंकण्याची रीत कोणती बा ?
आकाशपुष्पांची भट्टी लावून
अत्तर कसे काढणार बा ?
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
मनुष्यत्व प्राप्त केल्याविना
देवत्व कसे मिळविणार बा ?

-( वचन क्र. ४०९ )-

## – त्र्याऐंशी –

इल्लि गुडिगे बरुववरेल्ल भक्तरल्ल,
शाले सेरुववरेल्ल विद्यार्थिगळल्ल,
शस्त्र हिडिदवरेल्ल शूररल्ल,
शास्त्रकलितवरेल्ल शांतरल्ल,
गड्ड बिट्टवरेल्ल मुसलमानरल्ल,
शिलुबे धरिसिदवरेल्ल क्रैस्तरल्ल,
लिंग धरिसिदवरेल्ल लिंगायतरल्ल,
जनिवार हाकिदवरेल्ल ब्राह्मणरल्ल,
पदवि पडेदवरेल्ल प्रबुद्धरल्ल,
स्नान माडिदवरेल्ल शुद्धरल्ल,
चर्चे माडुदवरेल्ल साक्रेटीस अल्ल,
राजकारणल्लिरुववरेल्ल जयप्रकाशअल्ल,
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
'अहंब्रह्मास्मि' एन्नुववरेल्ल अद्वैतिगळल्ल !

येथे मंदिरात येणारे सर्वच भक्त नव्हेत,
शाळेत शिकणारे सर्व विद्यार्थी नव्हेत,
शस्त्र धरणारे सर्व शूर नव्हेत,
शास्त्र शिकणारे सर्व शांत नव्हेत,
दाढी राखणारे सर्व मुसलमान नव्हेत,
क्रूस धारण करणारे सर्व ख्रिश्चन नव्हेत,
लिंग धारण करणारे सर्व लिंगायत नव्हेत,
जानवे घालणारे सर्व ब्राह्मण नव्हेत,
पदवीधारी सर्व प्रबुद्ध नव्हेत,
स्नान करणारे सर्व शुद्ध नव्हेत,
चर्चा करणारे सर्व सॉक्रेटीस नव्हेत,
राजकारणी सर्व जयप्रकाश नव्हेत,
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
'अहंब्रह्मास्मि' म्हणणारे सर्व अद्वैती नव्हेत!

–( वचन क्र. ४१३ )–

# – चौऱ्याऐंशी –

समुद्रके नीरडिके येंदरे
अदक्क नीरु कुडिसुववरारय्या ?
हिमाद्रिये ननगे नेगडियेंदरे
अदर मूग नोरसुववरारय्या ?
सूर्यने ननगे सेकेयेंदरे
अवनिगे गाळिहाकुववरारय्या ?
चंद्रने ननगे चळियेंदरे
अवनिगे कंबळि होदिसुववरारय्या ?
नेलवे ननगे हसिवेयेंदरे
अदक्के अशनवीयुववरारय्या ?
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
महातमरिगे मन्नणेय दाह अंटिदरे
अदन्नु निवारिसववरु यारय्या ?

समुद्रच तहान लागली म्हणाला तर
त्याला पाणी पाजविणार कोण बा ?
हिमालयच मला पडसे झाले म्हणाला तर
त्याचे नाक कोण पुसणार बा ?
सूर्यच मला उकडते म्हणाला तर
त्याला वारा घालणार कोण बा ?
चंद्रच मला थंडी वाजते म्हणाला तर
त्याला कांबळे पांघरविणार कोण बा ?
भूमीनेच मला भूक लागली म्हटले तर
तिला अन्न घालणार कोण बा ?
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
महात्म्यालाच आत्मगौरवदाह झाला तर
त्याचे निवारण करणार कोण बा ?

–( वचन क्र. ४१५ )–

## - पंच्याऐंशी -

मुन्नुडिओदि वादिसिदनोब्ब,
सादर स्वीकारवन्नोदि वादिसिदनिन्नोब्ब –
इब्बरू मूल ग्रंथवन्नु ओददवरे !
किंवदंतिगळन्नु केळि नंबिदनोब्ब
कनसिनल्लि कंडु नंबिदनोब्ब –
इब्बरू प्रत्यक्ष काणदवरे, प्रमाणिसिनोडदवरे !
मंदिमाडिदरेंदु माडिदनोब्ब,
हिंदिनिंद बंदुदेंदु माडिदनिनोब्ब –
इब्बरू स्वंत विचारिसि, विमर्शिसि माडदवरे !
तिळिदू मनस्सिल्लदे माडि केट्टनोब्ब,
तिळियदेये मनस्सिट्टु माडि केट्टनिनोब्ब–
इब्बरू माडि केट्टवरे ! स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
निन्न स्वीकरिसि निन्न मक्कळ
तिरस्करिसि केट्टनोब्ब,
निन्न मक्कळ स्वीकरिसि निन्न निराकरिसि
केट्टनिनोब्ब – इब्बरू विफलरे !

प्रस्तावना वाचून चर्चा करणारा एक,
साभार स्वीकार वाचून चर्चा करणारा आणखी एक
दोघेही मूळ ग्रंथ म्हणून न वाचलेले !
किंवदंति ऐकून विश्वासणारा एक
स्वप्नात पाहून विश्वासणारा आणखी एक –
दोघेही प्रत्यक्ष न पाहिलेले न पारखलेले !
लोकांनी केले म्हणून करणारा एक,
पूर्वापार चालत आले म्हणून करणारा एक,
दोघेही स्वत: विचार, चौकशी केल्याविना करणारे
जाणून मनात नसता करून बिघडलेला एक,
अजाणता मन:पूर्वक करून बिघडलेला आणखी एक –
दोघेही करून बिघडलेले! स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
तुला स्वीकारून तुझ्या मुलांना
तिरस्कारून बिघडलेला एक,
तुझ्या मुलांना स्वीकारून तुझ्या निराकरणाने
बिघडलेला आणखी एक – दोघेही विफलच !



–( वचन क्र. ४१८ )–

## - शहाऐंशी -

❀

कोय्यवरेंदु तेने बिडदे शालि,
गोनें बिडदे बाळे, ननेने बिडदे बळ्ळि ?
ओय्यवरेंदु गळपदे गिळि,
कुणियदे नविलु, जिगियदे चिगरि ?
कल्लिड्डवरेंदु फल बिडदे मर,
गूडिड्दे जेनुहुळ, बच्चु कट्टदे हक्कि ?
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
बीगळेवरेंदु बरेयने कवि,
बोधिसने प्रवादि हिंदेगेवने सत्यवादि ?

❀

कापतील म्हणून साळी निसवणार नाही,
केळ फळणार नाही, वेल फुलणार नाही ?
धरून नेतील म्हणून पोपट बोलणार नाही,
मोर नाचणार नाही, हरीण कुदणार नाही ?
दगड मारतील म्हणून वृक्ष फळणार नाही,
मधमाशी मोहोळ धरणार नाही, पक्षी घरटे बांधणार नाही?
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
टीका होईल म्हणून कवी लिहिणार नाही,
हरदास उपदेश करणार नाही, सत्यवादी सत्यावर ठरणार नाही?

-( वचन क्र. ४२२ )-

## – सत्याऐंशी –

सूर्य बरुवाग सद्दिल्ल, गद्दलविल्ल,
सिडिलु बरुवाग किविगडचिक्कुवुदय्या;
शशि बरुवाग तुसुवू तोंदरेयिल्ल
मिंचु होय्वाग कण्णु कुक्कुवुदय्या,
सुग्गि बरुवाग स्वल्पवू कोटलेयिल्ल,
मागि बरुवाग तरगेले–सरि मर्मर स्वरवय्या;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
बल्लवरु इरुवल्लि एळ्ळनितो सोरहिल्ल,
गांपरिरुवल्लि रंप बहळवय्या !

सूर्य येताना गोंगाट नाही गोंधळ नाही
वीज येताना कानठळ्या बसणार बा;
चंद्र येताना थोडाही त्रास नाही
वीज चमकताना नेत्र दिपणार बा,
सुगी येताना थोडाही उपद्रव नाही
शिशिरागमी गलितपर्ण मर्मरस्वर बा;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
जाणत्याची तिळमात्र बढाई नाही,
अजाणत्याची बडबड फार बा !

–( वचन क्र. ४२५ )–

## - अठ्याऐंशी -

हळे मरद चिगुरु, 'नानु नव, नानु नव' एंदितु,
बोड्डे केळि नक्कितु;
होळेय होस नीरू 'नानु नव, नानु नव एंदितु,
कडलु केळि नक्कितु;
कार होस मोड 'नानु नव, नानु नव' एंदितु,
बानु केळि नक्कितु;
कविय होस कवन 'नानु नव, नानु नव' एंदितु,
काल केळि नक्कितु;
तोट्टिलद होस कूसु 'नानु नव, नानु नव' एंदितु,
स्वतंत्रधीर सिद्धेश्वर केळि नक्क !

जुन्या झाडाचा नवा फुलोरा 'मी नवा, मी नवा' म्हणता,
ऐकून बुंधा हसला;
नदीचे नवे पाणी 'मी नवे, मी नवे' म्हणता,
ऐकून समुद्र हसला;
पावसाचा पहिला मेघ 'मी नवा, मी नवा' म्हणता,
ऐकून आकाश हसले;
कवीचे नव काव्य 'मी नवे, मी नवे' म्हणता,
ऐकून काळ हसला;
पाळण्यातले नूतन बालक 'मी नवे, मी नवे' म्हणता,
स्वतंत्रधीर सिद्धेश्वर ऐकून हसला !

-( वचन क्र. ४२८ )-

## – एकोण्णत्वद –

हेण्णे, नीनु सहनेयल्लि पृथ्वी,
क्षमेयल्लि जल,
करुणेयल्लि आकाश,
आश्रयवीयुवल्लि वायु,
आदरे, हत्तिरिद्दाग तम्पेरचि,
दूरविद्दाग सुडुव बेंकि !
आ सुडुव बेंकि अदेष्टु सुखकर !
मिलनद माधुर्यक्के प्रच्छन्न वर !
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरन सृष्टियल्लि
निन्निद कळे
गंडिन बाळिगे
नीने मधुरद मळे
बदुकिन बेळगे !

स्त्रिये, तू सहनशीलतेत पृथ्वी
क्षमेमध्ये जल,
करुणेत आकाश,
आश्रयात वायू,
परंतु, जवळ असता शीतल सिंचन,
वियोगात धगधगते इंधन !
तो विरहाग्नी किती सुखकर !
मीलन माधुर्याला प्रच्छन्न वर !
स्वतंत्रधीर सिद्धेश्वराच्या सृष्टीत
तुझी आभा
पुरुषाची शोभा
तूच माधुर्याची वृष्टी
जीवन सृष्टीला !

–( वचन क्र. ४३२ )–

तूगि कट्टुवुदे ईसुगुंबळद बेलेय ?
अळेदु कट्टुवुदे वज्र वैढूर्यंगळ बेले ?
एणिसि कट्टुवुदे कलाकृतिगळ बेले ?
वस्तुविगे सरियाद वरेगल्लु बेडवे ?
पदार्थक्के तक्क परीक्षे बेडवे ?
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
जिनसुगळ बेले कट्टिदंते
जनर बेले कट्टिदरे हेगय्या ?

तोलून ठरवायचे का पोहेण्याच्या भोपळचाचे मूल्य ?
मापून ठरवायचे का हिऱ्यामाणकांचे मूल्य ?
मोजून ठरवायचे का कलाकृतींचे मूल्य ?
वस्तूसाठी योग्य कसोटी नको का ?
पदार्थाची उचित परीक्षा नको का ?
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
जिनसांचे मूल्य ठरविल्या प्रमाणे
माणसांचे मूल्य ठरविले तर कसे बा ?

–( वचन क्र. ४३६ )–

करुणेये काशि, दयेये गये,
कनिकरवे कांचि, केदारगळय्या;
प्रीति ज्योतिर्लिंग, ममते मक्का मदीना,
भ्रातृत्ववे बेत्लेहेम, कंडय्या;
कल्याणवे कल्याण, औदार्यवे उडुपी,
सद्गुणगळे शृंगेरि श्रवणबेळुगोळगळय्या;
शुद्धांतरंगवे गंगे, यमुने, तुंगभद्रे,
पावनते कावेरि, निर्मलते नर्मदे,
शुभ्रशीलवे कृष्णे गोदावरिगळय्या;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
जीवियिद्दॆडे क्षेत्र, हृदयविद्दॆडे तीर्थ,
सद्भाव, सत्कर्मगळिद्दॆडेयोळे सद्धर्मवय्या !

करुणाच काशी, दयाच गया,
कळवळाच कांची, केदारादी बा;
प्रीतिज्योतिर्लिंग, ममता मक्का मदीना,
भ्रातृत्वच बेत्लहेम, पाहा बा;
कल्याणच कल्याण, औदार्यच उडुपी,
सद्गुणच शृंगेरी, श्रवणबेळगोळादी बा;
शुद्धांतरंगच गंगा, यमुना, तुंगभद्रा,
पावनता कावेरी, निर्मलता नर्मदा,
शुभ्रशीलच कृष्णा, गोदावर्यादी बा;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
मानव असेल तेथे क्षेत्र, हृदयअसेल तेथे तीर्थ
सद्भाव सत्कर्मांच्या ठायीच सद्धर्म बा !

-( वचन क्र. ४४० )-

प्रीतिसुववरन्नु पडेयुवुदु कठिन,
अदक्कू कठिन-केडदंते प्रीतिय कायुकोंडु होगुवुदु,
अत्युन्नतिगे एरुवुदु कठिन
अदक्कू कठिन-एरि अल्लिये उळिवुदु,
आदर्श वोंदु आय्दुकोळ्ळुवुदु कठिन,
अदक्कू कठिन-अदरंते आचरिसुवुदु,
कवितेय समर्पक व्याख्ये नीडुवुदु कठिन,
अदक्कू कठिन-अदरंते कविते बरियुवुदु,
सत्कीर्तियन्नु गळिसुवुदु कठिन,
अदक्कू कठिन-गळिसिदुदन्नु उळिसिकोळ्ळुवुदु,
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
निजमानवनागुवुदु कठिन,
अदक्कू कठिन, निजमानवनागि कोनेयवरिगू
उळियुदुदु ?

प्रेम करणारे लाभणे कठिण
त्याही पेक्षा कठिण अभंग प्रीती टिकविणे,
अत्युच्च स्थानी चढणे कठिण,
त्याही पेक्षा कठिण चढून तेथेच राहाणे,
एखादा आदर्श निवडणे कठिण,
त्याही पेक्षा कठिण-त्याच्यासारखे आचरणे,
कवितेची समर्पक व्याख्या देणे कठिण,
त्याही पेक्षा कठिण-तशी कविता लिहिणें,
सत्कीर्ती संपादणे कठिण,
त्याही पेक्षा कठिण-मिळविलेली टिकविणे.
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
खरा मानव होणे कठिण,
त्याही पेक्षा कठिण, खरा मानव होऊन
शेवट पर्यंत राहाणे !

-( वचन क्र. ४३७ )-

प्रीतिमार्ग, नीति मार्ग, सत्य मार्ग, स्नेह मार्ग,
विनय मार्ग, न्याय मार्ग, पंचशील मार्ग
इंदु एल्ल सद्गुणगळू मार्गफलकगळन्नु
आश्रयिसिवेयय्या !

मनदल्लि, मनेयल्लि स्थळविल्लवेंदु
बीदिपालु माडिरुवेवय्या सुगुणसंततियन्नु !
मोदलु निन्नतलेगे कट्टि हिग्गुत्तिदेवु,
कल्याणगुणगळन्नु-
ईग बीदिगळिगे अट्टि हर्षिसुत्तिहेवय्या
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

प्रीतिमार्ग, नीतिमार्ग, सत्यमार्ग, स्नेहमार्ग,
विनयमार्ग, न्यायमार्ग, पंचशीलमार्ग
आज सर्व सद्गुण मार्गफलकांच्या
आश्रयाला गेले बा !

मनात, घरात जागा नाही म्हणून
सुगुण संततीला रस्त्यावर सोडून दिले बा !
पूर्वी तुझ्या मस्तकी लादून कल्याणगुणांना,
समाधानी होतो-
आता रस्त्यावर ढकलून हर्ष मानीत आहोत बा
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

( वचन क्र. ४४६ )

## – चौऱ्याण्णव –

भारतक्के बहळष्टु 'बाबा' गळन्नु कोट्टिरुवे,
ईग साकष्टु 'भाभा' गळन्नु कोडय्या ;
बहळष्टु ताता एम्ब 'ताता' गळन्नु कोट्टिरुवे,
ईग साकष्टु 'टाटा' रन्नु कोडय्या;
ब्रह्मज्ञानिगळ जोतेगे विज्ञानिगळन्नु,
मंत्रदृष्टारर जोतेगे यंत्र-तंत्र ब्रह्मरन्नु सृष्टिसिल्लि!
इल्लिय नेल, जल, अनिल, तैल-सौरशक्तिगळ,
खनिजगळ बळसि
बडतनद अदिरिनिंदले सिरिसौख्यगळ
सुवर्णसृजिप
रससिद्धर हुट्टिसिल्लि
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

भारताला पुष्कळसे 'बाबा' दिलेस,
आता पुरेसे 'भाभा' देई बा;
पुष्कळसे पितृवत् 'पिता' दिलेस
आता पुरेसे 'टाटा' देई बा ;
ब्रह्मवेत्त्यांसह विज्ञानवेत्ते,
मंत्रदृष्टयासह यंत्रतंत्र विधाते निर्माण कर !
येथील स्थल, जल, अनिल, तैल-सौरशक्ती
खनिजे उपयोजून
गरीबीच्या अशुद्ध धातूतून श्रीसौख्याचे
सुवर्णनिर्मिते
रससिद्धीज्ञाते जन्माला घाल –
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

–( वचन क्र. ४४८ )–

-पंच्याण्णव-

भारतद भवितव्यवन्नु कुरितु चिंतिसुववने,
मोदलु निन्न कर्तव्यद बग्गे योचिसु !
अवरिवरु माडिदुदु सरियिल्लवेंदु साधिसुववने,
सरियादु दन्नोम्मे माडि तोरिसु !
केट्टुदक्केल्ल अवरिवरु होणगाररेंदु हेळुववने,
ओळ्ळेयदन्नु ओम्मेयादरू माडि तोरिसु !
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरन हेसरिनल्लि सवालु निनगे-
हळवरु हाळु माडिदरेंदु हेळि तृप्तनागदे
होसब नीनु एनादरु एद्दु काणुवुदन्नु माडि तोरिसु!

भारताच्या भवितव्याची चिंता करणाऱ्या,
आधी तुझ्या कर्तव्याचा विचार कर !
अमक्यातमक्याने केलेले अयोग्य म्हणून सिद्ध करणाऱ्या,
योग्य असलेले एकदा करून दाखव !
वाईटाला सर्व अमकेतमके जबाबदार म्हणून सांगणाऱ्या,
चांगले असलेले एकदा करून दाखव !
स्वतंत्रधीर सिद्धेश्वराच्या नावे आव्हान तुला-
जुन्यांनी सर्व हानी केली असे म्हणून तृप्त न होता
नवा तू काही उठून नजरेत भरेल असे करून दाखव !

-( वचन क्र. ४५१ )-

# - शहाण्णव -

ई देशदल्लि प्रतिभासंहार वागुत्तिरुवष्टु
इन्नाव देशदल्लि आगुत्तिदेवय्या ?
गुरुगळिंद शिष्यर प्रतिभा संहार,
वरिष्ठ अधिकारिगळिंद कनिष्ठ अधिकारिगळ
प्रतिभासंहार,
मालिकरिंद कार्मिकर प्रतिभासंहार,
हिरियरिंद किरियर, अत्तेयिंद सोसेय,
मेलिनवरिंद केळगिनवर प्रतिभासंहार !
धर्मद हेसरिनल्लि, देवर हेसरिनल्लि,
वर्णद हेसरिनल्लि, वर्गद हेसरिनल्लि,
भाषेय हेसरिनल्लि, प्रदेशद हेसरिनल्लि,
लिंग वयगळ हेसरिनल्लि, पक्षपंथगळ हेसरिनल्लि,
नडेदिदे निरंतर प्रतिभासंहार !
ई प्रतिभासंहारक्के तज्जन्य प्रतिभा पलायनक्के,
अड्डि माडा, अड्ड बारा– स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

या देशात होत असलेल्या प्रतिभासंहारा इतका
इतर कोण्या देशात होतोय का वा ?
गुरूकडून शिष्याचा प्रतिभासंहार,
वरिष्ठ अधिकाऱ्याकडून कनिष्ठ अधिकाऱ्याचा
प्रतिभासंहार,
मालकाकडून मजुरांचा प्रतिभासंहार,
मोठ्यांकडून छोट्यांचा, सासूकडून सुनेचा,
वरच्याकडून खालच्यांचा प्रतिभासंहार !
धर्माच्या नावावर, देवाच्या नावावर,
वर्णाच्या नावावर, वर्गाच्या नावावर,
भाषेच्या नावावर, प्रदेशाच्या नावावर,
लिंग वयादीच्या नावावर, पक्षपंथादींच्या नावावर
चालला हे निरंतर प्रतिभासंहार !
या प्रतिभासंहाराला, तज्जन्य प्रतिभा पलायनाला,
अडव, आड ये– स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

–( वचन क्र. ४५३ )–

## - सत्त्याणणव -

इळेय काळवेल्ल दाळियिट्टरू
ओंदु पुट्ट दीपव अरिसलारदय्या;
खळचतुष्टय मत्तु मत्तु हुट्टिबंदरू
सकल दास्यवनिलिल स्थापिसलारदय्या;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
कैकालुगळिगे कोळ तोडिसि
स्वातंत्र्यद दमनवनिलिल साधिसलागदय्या !

जगातल्या सर्व अंधाराने हल्ला केला तरी
एक लहानसा दिवा विझवू शकत नाही बा,
खळचतुष्टय पुनःपुन्हा जन्मून आले तरी
सकलदास्य येथे स्थापू शकत नाही बा;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
हातापायात बेड्या ठोकून
स्वातंत्र्याचे दमन येथे साधू शकणार नाही बा!

-( वचन क ४५५ )-

## - अठ्ठयाणणव -

कन्नडिगर कंडरे कन्नडिगरंते,
मराठिगर कंडरे मराठिगरंते,
तिगुळ तेलुगर कंडरे तिगुळ तेलुगरंते,
अवरवर कंडरे अवरवरंते!
वेषवनु बदलिसुवंते भाषेयनु बदलिसुव
मोसेगारर कंडु हेसितय्य नन्न मन-
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

कन्नडीग पाहाताच कन्नडिगासारखे
महाराष्ट्रीय पाहाताच महाराष्ट्रीयासारखे
तमिळी पाहाताच तमिळासारखे
ज्याला ज्याला पाहातील त्याच्या त्याच्या सारखे!
वेषही बदलणाऱ्या भाषाही बदलणाऱ्या
धोकेबाजांना पाहून किळस येते मनाला-
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

-( वचन क. ४६६ )-

भारतीयरु मनस्सु माडिदरे
भारतक्के जगद्गुरुपट्ट कट्टबल्लरय्या ;
भारतीयरु निष्ठेयिंद दुडिदरे
प्रगतिय गौरीशंकरव मुट्टबल्लरय्या ;
भारतीयरु बंधुभावदिंद ओंदागिद्दरे
एंथ वैरिय एदेयन्नु मेट्टबल्लरय्या ;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
भारतीयरु भारतीयतेय सितच्छत्र छायेयल्लि
भारतीयरागि बेळेदु
सर्वशुभंकररागि, अरिभयंकररागि तोळगि
बेळगुत्तिरलय्या !

भारतीयांनी मनावर घेतले तर
भारताला जगद्गुरुपद मिळवून देता येईल
भारतीयांनी निष्ठेने परिश्रम केले तर
प्रगतीचा गौरीशंकर गाठता येईल बा !
भारतीय बंधुभावाने एक झाले तर
कशाही वैऱ्याची छाती दडपतील बा !
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
भारतीय भारतीयत्वाच्या श्वेतछत्र छायेत
भारतीय होऊन राहिल्याने
सर्वशुभंकर होऊन, अरिभयंकर होऊन
तेजाने तळपतील बा !

-( वचन क्र. ४६२ )-

## - शंभर -

शाखोपशाखगळागि हब्बि हरडुत्तिवे
ज्ञानविज्ञान गळु,
ई शाखेगळिगोंदु बोड्डु बेडवे ?
बोड्डेय बुडक्के बेरुगळु बेडवे ?
यारु विचारिस बेकिदनु -
विश्वविद्यालयगळे सुस्तु होडेदरे,
प्राध्यापकरे प्रच्छन्न राजकारणिगळादरे,
विद्यार्थिगळु गोंदलुणिगळादरे ?
नन्न मट्टिगे मात्र
नीने बोड्डु, नीने बेरु -
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

शाखोपशाखांनी फोफावताहेत
ज्ञान विज्ञाने,
या शाखांना एखादा बुंधा नको का ?
बुंध्याच्या बुडाशी मुळ्या नकोत का ?
कोणी विचार करायला हवा ना -
विश्वविद्यालये सुस्तावली तर,
प्राध्यापकजन छुपे राजकारणी झाले तर,
विद्यार्थी गोंधळ घालणार नाहीत ?
माझ्यापुरते मात्र
तूच बुंधा, तूच मुळ्या
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

-( वचन क्र. ४६४ )-

# -एकशे एक-

कन्नड नाडिन कोडुगल्लगळु
चावुंडरायन बरव कायुत्तिवेयय्या;
कन्नडनुडिय साध्यवागिरद साध्यतेगळु
बसवण्णन बरव कायुत्तिरुवेयय्या;
कन्नड नाडिन ताळगरिगळु
कुमारव्यासन कंठपत्रक्कागि कादिवेयय्या;
ई नाडिन नदि नद प्रपातगळु
विश्वेश्वरय्यर दारि कायुत्तिवेयय्या;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
ई नाडिन बिदिरु कोळगालु, सोरे वीणेयागलु
कब्बि कुंचवागलु, उक्कुउळियागलु
मण्णु अन्नवागलु, हत्ति वस्त्रवागलु,
प्रकृति संस्कृतियागलु कादिवेयय्या!

कन्नड देशातील खडबडीत दगड
चावुंडराय येण्याची वाट पाहाताहेत बा;
कन्नड भाषेची-साध्य न झालेली साधना
बसवण्णांच्या आगमनाची वाट पाहाताहेत बा;
कन्नड देशातील ताडपत्रे
कुमार व्यासांच्या लेखणीची वाट पाहाताहेत बा!
या देशाचे नद, नदी, जलप्रपात
विश्वेश्वरय्यांची मार्गप्रतीक्षा करताहेत बा;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
या देशाचे वेळू वेणू होण्यासाठी, भोपळे वीणा होण्यासाठी,
काड्या कुंचले होण्यासाठी, लोह पटाशी होण्यासाठी
माती अन्न होण्यासाठी, कापूस वस्त्र होण्यासाठी,
प्रकृती संस्कृती होण्यासाठी आतुर आहेत बा!

-( वचन क्र. ४६५ )-

# - एकशे दोन -

याव विश्वास होदरू आत्मविश्वास होगदिरलय्या;
अष्टैश्वर्य होदरे होगलि, धैर्य होगदिरलय्या;
बल उडुगिदरे उडुगलि, छल उडुगदिरलय्या;
कीर्ति मसुळिसिदरे मसुळिसलि, स्फूर्ति
मसुळिसदिरलय्या;
मैय शृंगार मरेयादरे आगलि, मनद बंगार
बयलागदिरलय्या;
अलगु सोतरे सोललि, गलगु सोलदिरलय्य;
कर्णरथ कुसिदरे कुसियलि, मनोरथ कुसियदिरलय्य;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
नन्न बीडु अळिदरे अळियलि,
नन्न नाडु एंदेंदिगू उळिदिरलय्या!

कधी विश्वास गेला तरी आत्मविश्वास जाऊ नये बा;
अष्टैश्वर्य गेले तरी जावो, धैर्य जाऊ नये बा;
जोर गेला तरी जावो, जिद्द जाऊ नये बा;
कीर्ती मंदावली तरी मंदावो, स्फूर्ती
मंदावू नये बा;
शरीरसौंदर्य ओसरले तरी ओसरो, मनाचे सुवर्ण
सरू नये बा!
शस्त्र भंगले तरी भंगो, मूठ अभंग राहो बा,
कर्णरथ खचला तरी खचो, मनोरथ खचू नये बा;
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
माझे घर मिटले तरी मिटो,
माझा देश केव्हाही टिकून राहो बा!

—( वचन क्र. ४६८ )—

## - एकशे तीन -

उप्पिन काथि रुचियेंदु
अदन्ने उण्णलागुवुदेनय्या ?
रतिसमयद विवस्त्रते मोहकवेंदु
हाडुहगले नग्नते श्लाघ्यवेनय्या ?
काळगदल्लि कोले क्षम्यवेंदु
बाळिनुद्दक्कू वधे विधियेनय्या ?
मातिगित मौन मेलेंदु
जीवनवेल्ल मौनवागबेकेनय्या ?
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
अल्लि अमृत दोरेयल्लियेंदु
इल्लिय अंबलिय तोरेयलहुदेनय्या ?

लोणचे चविष्ट म्हणून
तेच जेवता येईल काय बा ?
रतिसमयाची विवस्त्रता मोहक म्हणून
दिवसाउजेडातील नग्नता स्तुत्य काय बा ?
युद्धात मारणे क्षम्य म्हणून
जीवनभर वध हाच विधी व्हावा काय बा ?
बोलापेक्षा मौन श्रेष्ठ म्हणून
जीवन सर्व मूक व्हावे काय बा ?
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
तेथे अमृत मिळणार म्हणून
येथील आंबिल सोडावे काय बा ?

-( वचन क्र. ४७५ )-

## - एकशे चार -

दोड्डदोड्ड मातुगळन्नाडि दोड्डवनागबेकेंब
दड्डतन आवरिसदिरलय्या नन्नन्नु ;
दोड्डवरन्नु बैदुबैदु दोड्डव नेनिसिकोळ्ळबेकेंब
मड्डतन मुसुकदिरलय्या नन्नन्नु;
दुड्डिन बलदिंद, दिड्डिबागिलिनिंद, अड्डदारियिंद
दोड्डदोण्णे हिडिदु, दोड्डजिगणेयागि दोड्डवनागबेकेंब
हेड्डतन होद्ददिरलय्य नन्नन्नु ;
दोड्ड मनदिंद दोड्डतन,
दोड्ड गुणदिंद दोड्डतन,
दोड्ड कार्यगळिंद दोड्डतनवेंबुद तिळिसि,
मरवेयिंदुळिसि, मनव तिळिगोळिसि बेळेसय्या–
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

मोठमोठ्या गोष्टी बोलून मोठा होण्यासाठी
मूर्खपणाचे आवरण मला नकोय बा ;
थोरामोठ्यांना नावे ठेवून स्वतःला मोठे म्हणविण्यासाठी
मठ्ठपणाने झाकळू नये बा मला ;
पैश्याच्या बळावर, मागील दाराने, आडवाटेने
मोठा दंडुका घेऊन, मोठी जळू होऊन, मोठा होण्यासाठी
वेडेपणाने घेरून टाकू नये बा मला;
मोठ्या मनाने मोठेपणा,
मोठ्या गुणाने मोठेपणा,
मोठ्या कार्यांनी मोठेपणा हे समजावून
विसरू न देता, मनाला निर्मळ करून वाढव बा–
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

–( वचन क्र. ४७६ )–

## - एकशे पाच -

ननगे बयसदे बंद पदविगळेल्ल
निन्न करुणेय कुरुहल्लदे
नन्न घनतेय गुरुतल्ल तंदे !
हिडि मण्णेनल्लि किडियोंद निरिसि कळिसिदे–
किडि पुटगोंडु अग्नियागि,
ईग बेळकागलु हारैसुत्तिदेयय्या!
बेळकिगे बेळकाद नीने
बेळकागिसय्य इदनु – स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा!

इच्छिल्याविना सर्व पदव्या लाभल्या मला
तुझ्या करुणेची खूण नसेल तर
माझ्या मोठेपणाला मोल नाही बापा!
मूठभर मातीत एक ठिणगी ठेवून पाठविलेस–
ठिणगी पेटून अग्नी होऊन,
आता प्रकाशण्यासाठी उत्सुक आहे बा !
प्रकाशाचा प्रकाश असा तूच
प्रकाशमान कर बा हिला–स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा!

–( वचन क्र. ५११ )–

## - एकशे सहा -

नीरिनल्ली ईसुवुदु मेलो,
हरिगोलिनल्ली तेलुवुदु मेलो ?
गिडदल्ली गूडु कट्टुवुदु मेलो,
गगनदलिल हाराडुवुदु मेलो ?
चेलुविनोडने चेल्लाट मेलो,
कर्तव्य दोडने कुस्ति मेलो ?
अरितु मरेयुवुदु मेलो,
मरेतु अरियुवुदु मेलो ?
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
नानु माडुव भक्ति मेलो,
नीनु नीडुव मुक्ति मेलो ?

पाण्यात पोहणे श्रेष्ठ,
का नावेत तरणें श्रेष्ठ ?
झाडावर घरटे बांधणे श्रेष्ठ,
का आकाशात उडणे श्रेष्ठ ?
सौंदर्याशी स्पर्धा श्रेष्ठ,
का कर्तव्याशी कुस्ती श्रेष्ठ ?
जाणून विसरणे श्रेष्ठ,
का विसरून जाणणे श्रेष्ठ ?
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा,
मी करायची भक्ती श्रेष्ठ,
का तू द्यायची मुक्ती श्रेष्ठ ?

-( वचन क्र. ५१५ )-



जन्म : १८-८-१९१८

## – एकशे सात –

स्वतंत्रधीर सिद्धेश्वर, प्रियकर,
नीनू हलवु दारियिंद बंदे,
नानू हलवु दारियिंद बंदे,
आदरे, संकेत स्थानदल्लि ओम्मे नीनिरलिल्ल –
ओम्मे नानिरलिल्ल !
निनगू मिलनद बयके, ननगू मिलनद बयके,
आदरे, नन्न बयके निन्न बयके
ओम्मेयू ओंदागलिल्ल,
मदुवेय बदुकु चेंदागलिल्ल !
हीगेये समानांतर रेखेगळंते
सागलेनय्य सतिपति संबंध ?
साकाय्तु बरि ब्रह्मगंटिन बंध,
बेकिन्नु बाहुबंध !

–( वचन क्र. ५१७ )–

स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा, प्रियकरा,
तूही अनेक मार्गांनी आलास,
मीही अनेक मार्गांनी आलो,
परंतु संकेत स्थानी कधी तू नव्हतास –
कधी मी नव्हतो !
तुलाही मीलनाची इच्छा, मलाही मीलनाची इच्छा
परंतु, माझी इच्छा नि तुझी इच्छा
एकदाही एक झाल्या नाहीत,
संसार सुखाचा झाला नाही !
असाच समांतर रेषांसारखा
चालायचा का बा सतिपतिसंबंध ?
पुरे झाला केवळ ब्रह्मगाठीचा ऋणानुबंध,
हवा अजून बाहुबंध !

## – एकशे आठ –

इदुवरेगे यांत्रिकवागि निन्न पूजे माडिदे:
नल्लिय नीरु, पेटेय हूवु,
अंगडिय अगरुबत्ति,
काळसंतेय काळिन नैवेद्यगळिंद !
इंदेन्न कलमलद कंबनिगळिंदले निनगे अभिषेक,
अनिमिष नयनगळे कुसुमगळु,
बिसियुसिरे धूप धूम्र,
गदगदिकेगळे मंत्रगळु,
संपूर्ण शरणागतिये नैवेद्यवय्या !
इदुवरेगे पूजे माडिदे
इंदु पूजे नानादे,
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

आतापर्यंत यांत्रिकतेने तुझी पूजा केली:
नळाचे पाणी, मंडईतली फुले
दुकानातली ऊदबत्ती,
काळ्या बाजारातील धान्याच्या नैवेद्याने!
आता कधी मलिन अश्रूंनी तुला अभिषेक,
अनिमिष नेत्रांची सुमने,
उष्ण उच्छ्वासाचे धूप धूम्र,
गद्गद्रवाचे मंत्र,
संपूर्ण शरणागतीचा नैवेद्य बा !
आतापर्यंत पूजा केली
आज मीच पूजा झालो,
स्वतंत्रधीर सिद्धेश्वरा !

–( वचन क्र. ५२२ )–

## काही टिपा –

योव्ह– ज्यू लोकांचा देव. मज्द– पारसिकांचा देव. श्रीगिरी– श्रीशैल्य पर्वत.

हरळय्या– बसवेश्वरकालीन एक शिवशरण. याने आपल्या मांडीच्या कातडीच्या वहाणा करून बसवेश्वरास अर्पण करण्याची सिद्धता दर्शविली होती.

नविलुतीर्थ– धारवाड जिल्ह्यातील सौंदत्ती गावाजवळ मलप्रभा नदीवर बांधलेले विशाल धरण.

पंपाक्षेत्र– कर्नाटक साम्राज्याची प्राचीन राजधानी (विजयनगर). येथे जवळच तुंगभद्रेवर मोठे धरण आहे.

भाक्रा-नांगल– पंजाबातील सतलज नदीवरील सुप्रसिद्ध धरणे. गारा– भिजविलेली माती, चिखल.

अंगुलिमाल– बुद्धकालातील एक कुप्रसिद्ध खुनी, बुद्धाच्या उपदेशाने त्याला उपरती होऊन तो सज्जन झाला.

मोनालिसा– लिओनार्डो द व्हिंसी ( १४५२–१५१९ ) या पाश्चात्य चित्रकाराचे सुप्रसिद्ध चित्र.

कल्याण– बसवकल्याण (जिल्हा बिदर) बिज्जलाची राजधानी व बसवेश्वराचे कार्यक्षेत्र.

उडुपी– दक्षिण कन्नड जिल्ह्यातील प्रसिद्ध क्षेत्र. येथील श्रीकृष्ण मूर्तीची प्रतिष्ठापना श्री. मध्वाचार्यांनी केली.

शृंगेरी– आद्य शंकराचार्यांचे स्थान.

चावुंडराय– श्रवणबेळगोळ येथील प्रसिद्ध गोमटेश्वराचा पुतळा घडविणारा राजा.

कुमारव्यास– कन्नड भाषेचा एक महाकवी, महाभारतकार.

## प्रा. चंद्रशेखर कपाळे यांचे प्रकाशित साहित्य

१) गंधवती : (काव्यसंग्रह) – प्रस्तावना – डॉ. द. रा. बेंद्रे – मूल्य ५ रुपये

२) श्री शरणबसवेश्वर चरित्र : (संपादित)
गेल्या शतकातील गुलबर्गा येथे प्रसिद्ध झालेले शिलामुद्रित मराठी पुराण – मूल्य ६ रुपये

३) वचनोद्यान : डॉ. सिद्धय्या पुराणिक यांच्या पुरस्कारप्राप्त कन्नड काव्यग्रंथाचा मराठी अनुवाद – मूल्य १० रुपये

आगामी प्रकाशने :


१) शिल्प : (काव्यसंग्रह)

२) श्री माणिकप्रभुचरित्र : (संपादित)

३) ? (संशोधनपर लेखसंग्रह)

प्राप्तीस्थळ : मराठी साहित्य मंडळ, स्टेशन बाजार, गुलबर्गा ५८५१०२

( वरील ग्रंथांशिवाय अन्य मराठी पुस्तकेही मागणीप्रमाणे शाळा, कॉलेज व ग्रंथालयांना पुरविली जातील.)



'वचनोद्यान'

या काव्यग्रंथास मिळालेले बहुमान

१) कर्नाटकराज्य साहित्य अकादमी पुरस्कार
( १९७७ चा सर्वोत्तम ग्रंथ ) – १९७८

२) भारतीय भाषा परिषद कलकत्ता –
द्रविड भाषांतील सर्वप्रथम पुरस्कार-१९८०

३) कर्नाटक विश्वविद्यालयाचा
प्रा. माळवाड बहुमान – १९८१

४) कन्नड साहित्य परिषदेचा बहुमान –१९८२

डॉ. सिद्धय्या कल्लिनाथ पुराणिक I. A. S.
ऊर्फ 'काव्यानंद'
जन्म : १८-८-१९१८

'श्रीगिरी' 4/5 A, अली असकर रोड,
बेंगलोर – 560052